शनिवार, २३ एप्रिल २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक २७५
www.ramprahar.com

# रामप्रहर


◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

चक्क चोरीच्या विजेतून संजय राऊतांची सभा/२
पेणमध्ये अधिकाऱ्यांना पाजले गढूळ, खारे पाणी/५
धाटाव विभागीय कबड्डी स्पर्धेत रोठ खुर्द संघ अव्वल/८

# विवेक पाटलांवरील आरोप गंभीरच

## मुंबई सत्र न्यायालयाच्या निकालपत्राचा सूर



**पनवेल : प्रतिनिधी**

तपास यंत्रणांनी न्यायालयासमोर ठेवलेली कागदपत्रे, मनी लॉण्डरिंगच्या गुन्ह्यात अर्जदाराचा असलेला सक्रिय सहभाग आणि त्याचा ठेवीदारांवर होणारा विपरीत परिणाम, आरोपांचे गांभीर्य आणि गुन्ह्याची पद्धती या गंभीर बाबी पाहता अर्जदार शेकापचे माजी आमदार आणि कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष विवेकानंद शंकर पाटील हे जामीनास पात्र नाहीत, असा सूर मुंबई सत्र न्यायालयाचे विशेष न्यायाधीश आर. एन. रोकडे यांनी दिलेल्या जामिनावरील निकालपत्राद्वारे व्यक्त होत आहे.

शेकापचे माजी आमदार आणि कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष विवेकानंद शंकर पाटील यांना जामीन नाकारताना सत्र न्यायालयाचे विशेष न्यायाधीश आर. एन. रोकडे यांनी अनेक गंभीर आक्षेप आपल्या निकालपत्रात नोंदविले आहेत. तपास यंत्रणांनी न्यायालयासमोर मांडलेल्या विविध मुद्द्यांच्या आधारे सत्र न्यायालयाने आपले मत व्यक्त केले आहे. समोर आलेल्या सर्व कागदपत्रांच्या आधारे आणि प्रथमदर्शनी पुराव्याच्या पार्श्वभूमीवर अर्जदार विवेक पाटील मनी लॉण्डरिंगच्या गुन्ह्यासाठी दोषी नाही असे मानण्यास वाजवी कारणे नाहीत, असेही मत सत्र न्यायालयाने नोंदविले आहे. **(पान २ वर..)**

## घोटाळेबाज विवेक पाटील दानवच!

माननीय न्यायालयाने विवेक पाटील यांच्यासंदर्भात दिलेल्या निकालामुळे सर्वसामान्य ठेवीदारांना समाधान लाभले आहे. विवेक पाटील यांनी आधी विश्वास मिळवून सर्वसामान्य माणसांकडून त्यांच्या ठेवी मिळवल्या आणि त्याच ठेवींचा वापर स्वत:साठी, स्वत:च्या कुटुंबासाठी, स्वत:च्या व्यवसायासाठी केला तसेच स्वत:च्या पक्षाच्या निवडणुकांसाठीही हा पैसा त्यांनी वापरला. ठेवीदारांचा ठेवीतला पैसा हा ठेवीदाराला व्याजासह परत मिळायला हवा होता. तो द्यायलाही विवेक पाटील यांनी मुजोरपणाने नकार दिला. या सर्व स्थितीत महाविकास आघाडीचे सरकार विवेक पाटलांच्या पाठीशी उभे राहिले. त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी महाविकास आघाडी सरकारने त्यांना हातही लावला नाही. केवळ 'ईडी'ने केलेल्या कारवाईमुळे विवेक पाटील यांना तुरुंगाची हवा खावी लागत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने विमा परताव्याबाबत घेतलेल्या नव्या निर्णयामुळे बँक ठेवीदारांना आता एक लाखाऐवजी थेट पाच लाख रुपये परत मिळताहेत. अशा परिस्थितीतही 'हे पैसे आम्ही मिळवून देत आहोत', असा खोटा, निगरगट्ट आव शेतकरी कामगार पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते आणत आहेत. याच शेकापच्या कार्यकर्त्यांनी आपल्या बॅनरवर घोटाळेबाज विवेक पाटील यांचे फोटो देवाप्रमाणे जपले आहेत, मात्र हे विवेक पाटील देव नसून दानव आहेत हे कोणीतरी स्पष्टपणे सांगण्याची आवश्यकता होती. आज न्यायालयाच्या निकालाने ते दाखवून दिलेले आहे. त्यामुळे माननीय न्यायालयाचे मन:पूर्वक आभार.

**–आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष, उत्तर रायगड भाजप**

# 'मातोश्री'वर हनुमान चालीसा वाचणारच!



राणा दाम्पत्य ठाम

**मुंबई : प्रतिनिधी**

आम्ही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानी शांततेत हनुमान चालीसा पठण करण्यासाठी आलो आहोत, पण पोलिसांनी आम्हाला घरातून बाहेर पडू नका यासाठी नोटीस दिली आहे. आम्ही धार्मिक उद्देशाने आलो आहोत. त्यामुळे आम्ही कोणत्याही परिस्थितीत उद्या सकाळी ९ वाजता 'मातोश्री'वर जाणारच, असा ठाम निर्धार खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांनी व्यक्त केला. ते शुक्रवारी (दि. २२) मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

महाराष्ट्रावर संकटे सुरू आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे विदर्भात येत नाहीत. शेतकऱ्यांच्या बांधावर येत नाहीत. दोन वर्षे मंत्रालयात येत नाहीत. राज्याचा विकास खुंटला आहे. ही साडेसाती दूर करण्यासाठी मातोश्रीवर हनुमान चालीसाचे पठण झाले पाहिजे, अशी विनंती आम्ही केली होती, पण काही लोकांनी त्याला विरोध केला. हनुमान चालीसाला विरोध करणारे बाळासाहेबांचे शिवसैनिक असूच शकत नाहीत, असे राणा दाम्पत्याने म्हटले.

ज्या ठिकाणी बाळासाहेबांची श्रद्धा आणि मातोश्री आपण हृदयामध्ये ठेवतो त्या ठिकाणी हिंदुंच्या नावाने हनुमान चालीसाला विरोध होत असेल, तर मला असे वाटते, की उद्धव ठाकरे हिंदूत्व विसरले आहेत आणि हिंदुत्वाची दिशा सोडून ते दुसऱ्याच दिशेला जाऊन महाराष्ट्राचे वाटोळे करीत आहेत, अशी टीका आमदार रवी राणा यांनी केली. बाळासाहेब आज असते तर एक वेळा नाही, तर शंभर वेळा हनुमान चालीसा वाचायची आम्हाला परवानगी दिली असती आणि आमचे स्वागतही केले असते, असा टोलाही त्यांनी लगावला.

या वेळी खासदार नवनीत राणा यांनी शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्यावरदेखील निशाणा साधला. संजय राऊतांनी तुमचा उल्लेख बंटी-बबली असा केला आहे असे विचारले असता खासदार राणा यांनी, संजय राऊत हे तर पोपट आहेत. रोज सकाळी पत्रकारांना बोलावून बडबड करतात, अशी टीका केली.

# मलिकांना दुहेरी दणका



- ईडीविरोधातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली
- विशेष पीएमएलए कोर्टाकडून ६ मेपर्यंत न्यायालयीन कोठडी

**मुंबई : प्रतिनिधी**

अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमशी संबंधित मनी लॉण्डरिंग प्रकरणात महाविकास आघाडीतील मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांना सर्वोच्च न्यायालयाने दणका दिला आहे. सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीच्या कारवाईविरोधात दाखल केलेली याचिका सुप्रीम कोर्टाने शुक्रवारी (दि. २२) फेटाळून लावली, तर मुंबई सत्र न्यायालयातील विशेष पीएमएलए कोर्टाने मलिकांच्या न्यायालयीन कोठडीत १४ दिवसांची वाढ केली आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्णयाला नवाब मलिकांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान देत सुटकेची मागणी केली होती. ती फेटाळून लावण्यात आली.

# सदावर्तेंना जामीन मंजूर

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या निवासस्थानी झालेल्या हल्ल्याप्रकरणी वकील गुणरत्न सदावर्ते यांना मुंबई सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. ११५ एसटी आंदोलकांनाही जामीन मंजूर झाला आहे.

न्यायालयाने सदावर्ते यांना ५० हजार रुपये रोख हमी व तितक्याच रकमेचा हमीदार, तर सर्व ११५ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांच्या वैयक्तिक हमीवर जामीन मंजूर केला आहे.



**पनवेल : जय भवानी नवतरुण मंडळाच्या वतीने धरणा कॅम्प येथे आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक भव्य राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्‌घाटन शुक्रवारी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कबड्डीप्रेमी उपस्थित होते. या स्पर्धेचा थरार रविवारपर्यंत रंगणार आहे.** (छाया : लक्ष्मण ठाकूर) **वृत्त उद्याच्या अंकात.**

## निवडक

### जम्मू काश्मीरमध्ये कारवाईत दोन दहशतवाद्यांचा खात्मा

**श्रीनगर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जम्मू दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि. २२) पहाटे दहशतवाद्यांविरोधात सुरक्षा दलाची चकमक झाली. जम्मूजवळ सुंजवा छावणी भागात झालेल्या या कारवाईदरम्यान दोन दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले, तर सुरक्षा दलाचा सहाय्यक पोलीस निरीक्षक शहीद झाला तसेच काही जवान जखमी झाले आहेत.

### आयआयटी मद्रासमध्ये ३० विद्यार्थी कोरोनाबाधित

**चेन्नई :** आयआयटी मद्रासमधील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात कोरोनाबाधित झाले असल्याचे समोर आले आहे. १९ एप्रिलला कोरोना संसर्ग झाल्याचे दिसून आल्यावर संकुलात चाचण्या घेण्यात आल्या, तेव्हा १२ विद्यार्थी कोरोनाबाधित असल्याचे स्पष्ट झाले. यात आणखी १८ विद्यार्थ्यांची भर पडून एकूण हा आकडा आता ३०वर पोहचला आहे.

# पनवेल मनपाने ग्रामीण भागातील कर भरणा सवलत वाढवावी

## भाजपच्या राजेश गायकर यांची आयुक्तांकडे मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेतर्फे ग्रामीण भागात बिले आता वितरीत होत आहेत. त्यामुळे जी सवलत वा अवधी शहरात यापूर्वी आपण दिला होता तीच सवलत ग्रामीण भागातील ग्रामस्थांना दिली जावी, अशा मागणीचे निवेदन शुक्रवारी (दि. २२) ओबीसी मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर यांनी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत आयुक्त गणेश देशमुख यांना दिले.

पनवेल महापालिकेच्या वतीने या महिन्यात गावागावातील मालमत्ता कराच्या बिलांचे वाटप करण्यात आले आहे. या बिलांवर ३० एप्रिलपर्यंत म्हणजेच एक महिन्यात मालमत्ता कर भरणाऱ्यांना १०% सवलत दिलेली आहे तसेच ३० नोव्हेंबरपर्यंत म्हणजेच तीन महिन्यांत कर भरणाऱ्या ग्रामस्थांना ५% सवलत दिलेली आहे. **(पान २ वर..)**




उद्‌घाटक

डॉ. कविता चौतमोल (महापौर, पनवेल महानगरपालिका)
सौ. सीताताई पाटील (उपमहापौर, पनवेल महानगरपालिका)
सौ. विद्या गायकवाड (नगरसेविका, पनवेल महानगरपालिका)

प्रमुख पाहुणे

आमदार श्री. प्रशांत ठाकूर (अध्यक्ष, उ. रायगड जिल्हा भाजपा)
श्री. अरुणशेठ भगत (अध्यक्ष, पनवेल तालुका भाजपा)
श्री. परेश ठाकूर (सभागृह नेते, पनवेल मनपा)
श्री. जगदिश गायकवाड (नगरसेवक, पनवेल मनपा)
सर्व नगरसेवक आणि नगरसेविका

एकच ध्यास कुस्तीचा प्रचार आणि प्रसार

स्थळ: टेंभोडे मैदान-पनवेल.

# उदगीर नगरीत जमला सारस्वतांचा मेळा

## मराठी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन

**उदगीर : प्रतिनिधी**

लातूरच्या उदगीर नगरीत ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सुरुवात झाली आहे. छत्रपती



शाहू महाराज सभागृहात व डॉ. ना. य. डोळे व्यासपीठावर खासदार शरद पवार यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २२) या साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन झाले.

उद्‌घाटन समारंभास संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे, ज्ञानपीठ विजेते दामोदर मावजो, माजी मंत्री शिवराज पाटील-चाकूरकर, सार्वजनिक बांधकाममंत्री अशोक चव्हाण, वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख, उद्योगमंत्री सुभाष देसाई, राज्यमंत्री तथा स्वागताध्यक्ष संजय बनसोडे, कौतिकराव ढाले-पाटील आदी उपस्थित होते.

तत्पूर्वी सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी चौकातून ग्रंथदिंडी काढण्यात आली होती. संमेलनाचे अध्यक्ष सासणे, स्वागताध्यक्ष बनसोडे, कार्याध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, कार्यवाह रामचंद्र तिरुके यांच्या उपस्थितीमध्ये ग्रंथदिंडीचे पूजन करण्यात आले. या ग्रंथदिंडीत विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते.

दरम्यान, तीन दिवस चालणाऱ्या या साहित्य संमेलनात साहित्यिक कार्यक्रमांची रेलचेल आहे, ज्याचा साहित्यप्रेमींना रसस्वाद घेता येणार आहे.

# एनडी स्टुडिओत रंगणार महाउत्सव

**चौक : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर कर्जत फाट्याजवळ असलेल्या प्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन देसाई यांच्या एनडी स्टुडिओत २८ एप्रिल ते १ मे या कालावधीत महाउत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कला, क्रीडा, स्वाद, संस्कृती, व्यवसाय यांचा मिलाफ असलेल्या या महाउत्सवात विविध कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना मिळणार आहे.

राज्यभरातील पाच हजार शालेय विद्यार्थी रुबिक्स क्यूब सोडवून छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य प्रतिमा साकारणार आहेत आणि हा एक विश्व विक्रम ठरणार आहे. या महाउत्सवात १० हजारहून अधिक कलाकार महाराष्ट्राच्या महानतेचा इतिहास, संस्कृती, क्रीडा, कला, चित्रपट, व्यवसाय, वाणिज्य आणि बरेच काही असेल. विशेष म्हणजे सर्वांना प्रवेश विनामूल्य आहे.

# भारनियमनावरून भाजप राज्यात रान पेटवणार

## ■ विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांचा इशारा

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारनियमनाला राज्यातील महाविकास आघाडी सरकार जबाबदार आहे. नागरिकांकडून सुरक्षा अनामत रक्कम वसूल केली जात आहे. हे थांबविण्यासाठी भाजप आंदोलन करेल. वीज मंडळाच्या कार्यालयांवर भाजप आंदोलन करणार आहे, असा इशारा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी दिला आहे. राज ठाकरेंची सभा, नवनीत राणा, हनुमान चालीसा या मुद्द्यांवरूनही दरेकर यांनी आघाडी सरकारला टोला लगावला आहे. संजय राऊत यांच्यावरही निशाणा साधला आहे.

कोळसा टंचाई आणि ढिसाळ नियोजनामुळे राज्यात भारनियमन सुरू आहे. राज्यातील २७ वीजनिर्मिती संयंत्र बंद आहेत किंवा देखभाल दुरुस्ती सुरू आहे. ऐन उन्हाळ्यात देखभाल दुरुस्ती केली जात आहे. वीजेची मागणी कमी असताना ही कामं केली जातात. मात्र, ऐन उन्हाळ्यात ही कामं सुरू आहे. Mercच्या सूचनांचे पालन केले जात नाही, असा हल्लाबोल दरेकर यांनी केला. फडणवीस सरकारच्या काळात भारनियमन केले नाही. सन



२०१८-१९मध्ये राज्यात वीज सरप्लेस होती. आता वीज नाही. राज्य सरकार केंद्र सरकारवर आरोप करत आहे. केंद्र सरकार कोळसा देत नाही, असे खापर फोडले जात आहे, पण केंद्र सरकारकडून राज्याला नेहमी पेक्षा जास्त कोळसा दिला जात आहे. राज्य सरकार स्वतः वीज निर्मती करत नाही, एकही नवा प्रकल्प सरकारने आणला नाही, असा निशाणा दरेकर यांनी साधला. कोळशाच्या ठिकाणी भ्रष्टाचार होत असल्याचे पत्र खुद्द काँग्रेस प्रदेशाध्यक्ष यांनी दिले आहे. कोणाचा कोणाला समन्वय नाही. महाजनकोला सबसिडीचे साडेतीन हजार कोटी रुपये द्यायचे आहेत, राज्य सरकार ते देत नाहीत. सरकारच्या खात्यांचे वेगवेगळा निधी देणं गरजेचं आहे, तो दिला जात नाही. खासगी वीज खरेदी केली जात नाही. खासगी वीज निवडक लोकांना देऊन कमिशन खाता यावं, हा प्रयत्न सरकारचा आहे, असा गंभीर आरोप दरेकर यांनी केला.

### 'त्या' दगडफेकीचे फुटेज मागविलेय

***नवनीत राणा यांच्या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे. हनुमान चालीसा म्हणणे हे भाजपचे अभियान नाही, असे त्यांनी स्पष्ट केलं. राज ठाकरे यांच्या सभेला परवानगी देणे आवश्यक आहे. मुस्कटदाबी करता कामा नाये. असदुद्दीन ओवेसी यांना सभेसाठी परवानगी देता, मग राज यांना का नाही? असा सवाल दरेकर यांनी केला. भाजपच्या पोलखोल यात्रेवरील दगडफेकप्रकरणी युवासेनेच्या दोन पदाधिकाऱ्यांना अटक झाली आहे. यात स्थानिक आमदार त्यांचे पुत्र आणि कन्या सहभागी असल्याचा आमचा संशय आहे. सीसीटीव्ही फुटेज मागितले आहे, असेही दरेकर म्हणाले.***

## चक्क चोरीच्या विजेतून संजय राऊतांची सभा

### ऊर्जामंत्री नितीन राऊतांच्या शहरातच धक्कादायक प्रकार

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात सध्या विजेच्या तुटवड्यामुळे भारनियमन सुरू असल्याने सर्वसामान्यांकडून संताप व्यक्त होत असताना ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या नागपूर शहरात शिवसेना नेते संजय राऊत यांनी गुरुवारी घेतलेली सभा चोरीच्या विजेतून झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे सखेद आश्चर्य व्यक्त होत आहे.

ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी गुरुवारी राज्यात कोळशाच्या टंचाईमुळे वीजनिर्मितीवर परिणाम झाल्याचे सांगत महावितरण वीज चोरीच्या विरोधात कठोर कारवाई करणार असल्याचा दावा केला होता. त्याला काही तास उलटत नाही तोच शिवसेना नेते संजय राऊत यांची ऊर्जामंत्री नितीन राऊत यांचे शहर असलेल्या नागपुरातील गजाननगर परिसरात घेतलेली सभाच चोरीच्या विजेतून झाल्याचे पुढे आले आहे. सभेतील रोषणाईसह स्पीकर तसेच इतर गोष्टींसाठी आवश्यक वीज आकडे टाकून थेट महावितरणच्या वीज वाहिनीवरून चोरट्या पद्धतीने घेण्यात आली होती. त्यामुळे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांच्या दाव्याप्रमाणे महावितरण या प्रकरणात कुणावर काय कारवाई करून गुन्हा दाखल करणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## मलिकांना मंत्रिपदावर ठेवणे हाच महाराष्ट्राचा अपमान

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

तुरुंगाच्या कोठडीतून मंत्रिपदाचा कारभार पाहणाऱ्या नवाब मलिक यांच्यावर पाच हजार पानांचे आरोपपत्र दाखल असून सर्वोच्च न्यायालयानेही त्यांची याचिका फेटाळून लावली आहे. असे असताना त्यांना मंत्रिमंडळात ठेवून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे महाराष्ट्राचा अपमान करीत आहेत. आता तरी मुख्यमंत्र्यांनी मलिक यांची हकालपट्टी करून महाराष्ट्राचा अपमान थांबवावा अशी जोरदार टीका भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी (दि.२१) केली.

भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. उपाध्ये म्हणाले की, बेनामी मालमत्तांच्या व्यवहारातून गोळा केलेला पैसा दाऊदच्या दहशतवादी कारवायांना पुरविण्याचा आरोप असलेल्या मलिक यांची तुरुंगात राहून सर्वाधिक काळ बिनखात्याचे मंत्री म्हणून नवा विक्रम केला आहे. खरे तर मलिक यांना अटक झाल्या झाल्या त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करायला हवी होती. एरवी महाराष्ट्राच्या अस्मितेची भाषा वारंवार करणाऱ्या मुख्यमंत्र्यांना मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपींशी संबंध ठेवणाऱ्या मलिक यांची पाठराखण करताना महाराष्ट्राचा अपमान होतो आहे याची जाणीव नसावी हे दुर्दैवी आहे असं त्यांनी सांगितले.

### ❙ भाजपचे टीकास्त्र

तसेच गेल्या अडीच वर्षात मुख्यमंत्री ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या अस्मिता दुखावणाऱ्या कारवायांना सातत्याने प्रोत्साहनच दिले असून नवाब मलिक यांना तर त्यांनी चांगल्या कामाचे प्रशस्तीपत्रकही देऊन टाकले होते. शंभर कोटींच्या खंडणी प्रकरणातील सचिन वाझे हा काही लादेन नाही अशा शब्दांत त्याची प्रशंसाही केली होती. केंद्रीय मंत्री राणे यांच्या घरावर चाल करून जाणाऱ्यांच्या सत्कारास प्रोत्साहन देऊन मुख्यमंत्र्यांनी आपल्या मनोवृत्तीचे दर्शन महाराष्ट्रास घडविले होते. सातत्याने आपली खुर्ची जपण्यासाठी मुख्यमंत्री महाराष्ट्राचा अपमान करीत आहेत असेही केशव उपाध्ये यांनी म्हटले आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून कारवायांना सातत्याने प्रोत्साहन

***गेल्या अडीच वर्षांत मुख्यमंत्री ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या अस्मिता दुखावणाऱ्या कारवायांना सातत्याने प्रोत्साहनच दिले, असा आरोप भाजपाने केला.***

मलिक यांच्यावर ईडीने अंडरवर्ल्डशी संबंध आणि टेरर फंडिंग केल्याचा गंभीर आरोप केला आहे. अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमची बहीण हसीना पारकर हिच्याकडून एक जमीन अवैध मार्गाने एका पैशाच्या मोबदल्यात खरेदी केली. अंमलबजावणी संचालनालयाने त्यांच्या तपासात हसिना पारकरचा मुंबईतील कुर्ला परिसरातील गोवा वाला कंपाऊंडमधील सुमारे ३ एकर जमिनीवर डोळा असल्याचे आढळून आले. या जमिनीची मालकी मुनिरा प्लंबर नावाच्या महिलेकडे असली तरी तिने या जमिनीवर स्थायिक झालेल्या भाडेकरूंकडून पैसे वसूल केले होते असेही ते म्हणाले.

## सर्वसामान्य प्रवाशांची 'लालपरी' येतेय पूर्वपदावर!

**७६,९६२ कर्मचारी हजर**

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

विलीनीकरणाच्या मुख्य मागणीसह इतर काही मागण्यांसाठी गेल्या सहा महिन्यांपासून आंदोलनाचे हत्यार उपसलेले एसटी कर्मचारी अखेर सेवेत रूजू झाले आहेत. त्यामुळे सामान्यांची जीवनवाहिनी असलेली एसटी पुन्हा एकदा रस्त्यांवर धावू लागली आहे. एसटीच्या पटावरील एकूण ८२,२६३ कर्मचाऱ्यांपैकी ७६,९६२ कर्मचारी गुरुवारपर्यंत कामावर परतले आहेत. ११ हजार कर्मचारी अद्याप बडतर्फ आहेत. संपापूर्वी एसटीच्या सेवेत एकूण ९२,२६६ कर्मचारी होते.

दीर्घ प्रतीक्षेनंतर मोठ्या प्रमाणावर बसफेऱ्या सुरू झाल्याचे दिलासादायक चित्र दिसू लागले. ग्रामीण भागाला मोठा आधार मिळू लागला आहे. बुधवारी महामंडळाने राज्यात २९ हजार फेऱ्या चालवल्या. यातून १७.७८ लाख प्रवाशांची वाहतूक करत ११ कोटींचे उत्पन्न मिळवले, अशी माहिती महामंडळाने दिली. विलीनीकरण, वेतनवाढीसह अनेक मागण्यांसाठी २५ ऑक्टोबर २०२१पासून कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन सुरू केले होते. संपकरी कर्मचारी कामावर परतत असल्याने सेवा पूर्वपदावर येण्याची आशा आहे. मात्र, एसटी महामंडळातील पाच हजारांहून अधिक बसची स्थिती भंगारसदृश्य झाल्याने आता प्रवासी वाहतुकीसाठी खासगी वाहने भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहेत. बेस्टच्या धर्तीवर एसटी महामंडळ करारानुसार खासगी बस चालवणार आहे. या बससाठी ४७ रुपये प्रतिकिमी असा मोबदला महामंडळ देणार आहे.



लातूर, कोल्हापूर, रायगड आणि रत्नागिरी या विभागात खासगी गाड्यांसाठी एका ट्रॅव्हल्सची निवड करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ५०० गाड्या भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहेत. सध्या ३२० गाड्यांपैकी २२० गाड्यांचे कंत्राट 'साई गणेश'ला देण्यात आले. १८० गाड्यांसाठीही ही ट्रॅव्हल कंपनी प्रयत्नात आहे. लातूर, धुळे, कोल्हापूर व रायगड/ रत्नागिरी विभागांमध्ये साध्या बसची उणीव भासत आहे. या भागातील अन्य फेऱ्यांना मागणी वाढत आहे. अशातच प्रवाशांकडून साधी एसटी सुरू करण्याची मागणी होत असल्याने भाडेतत्त्वावरील गाड्या या विभागात प्राथमिकतेने सुरू करण्यात येणार आहेत.

दरम्यान, पटावरील ८२,२६३ पैकी ७६,९६२ कर्मचारी कामावर परतले आहेत.

### ११ हजार कर्मचारी बडतर्फ

***बडतर्फ उच्च न्यायालयाने सर्व संपकरी कर्मचाऱ्यांना कामावर हजर राहण्यासाठी शुक्रवारपर्यंत मुदत दिली होती. अद्याप १६ हजार संपकरी कर्मचारी कामावर हजर झालेले नाहीत. यातील ११ हजार कर्मचारी बडतर्फ आहेत. यामुळे त्यांच्यावरील बडतर्फीची कारवाई कायम राहणार की त्यांना मुदतवाढ मिळणार यावर निर्णय अपेक्षीत आहे.***

## ठाकरे सरकारकडून ग्राहकांची लूट

### भाजपचे नेते आमदार आशिष शेलार यांचा आरोप

**पुणे : रामप्रहर वृत्त**

'टक्केवारी'च्या हव्यासापोटी खुल्या बाजारातून चढ्या दराने वीज खरेदी करण्यासाठीच राज्यात आघाडी सरकारकडून विजेची कृत्रीम टंचाई निर्माण केली जात असल्याचा घणाघाती आरोप भारतीय जनता पक्षाचे नेते, माजी मंत्री आशिष शेलार यांनी शुक्रवारी (दि. २२) पुणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केला. आघाडी सरकारच्या नियोजनशून्य कारभाराविरोधात भाजपा राज्यव्यापी आंदोलन करणार असल्याचेही आ. शेलार यांनी सांगितले.

आ. शेलार म्हणाले की, कमाल मागणीच्या वेळात सुमारे सहा हजार मेगावॅट विजेचा तुटवडा असताना अन्य क्षेत्रातून जेमतेम १३०० मेगावॅट वीज खरेदी केली जात आहे. सरकारने खरेदी केलेल्या विजेचे पैसेही वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी खाजगी क्षेत्राकडून वीज नियामक आयोगाकडे केल्या जात असल्याने राज्य सरकारची पत संपुष्टात आली आहे. एकीकडे थकबाकी वाढत असताना विशिष्ट खाजगी पुरवठादारांशी हातमिळवणी करून चढ्या दराने वीज खरेदी करावयाची आणि त्याचा भार ग्राहकाच्या माथ्यावर मारायचा.

तीन आठवड्यांपासून राज्यात विजेचा खेळखंडोबा सुरू आहे. दीड तासांपासून सहा तासांपर्यंत वीज गायब असल्याने ग्राहक होरपळत असताना सुरक्षा अनामत रक्कम दुप्पट करून सरकारने ग्राहकाच्या खिशातून सक्तीची वसुली सुरु केली आहे. सरकारी कार्यालयांची हजारो कोटींची थकबाकी, सामान्य ग्राहताच्या थकबाकी वसुलीसाठी वीज कापण्याची कारवाई, ढिसाळ व्यवस्थापनामुळे निर्माण झालेली कोळशाची टंचाई, ऐन उन्हाळ्यात सक्तीने बंद ठेवलेली वीजनिर्मिती संयंत्रे अशा बेदरकार कारभारामुळे राज्याचे वीज व्यवस्थापन कोलमडले आहे. राज्यातील सुमारे २७ वीजनिर्मिती संयंत्रे जेमतेम चालवली जात आहेत. विजेची मागणी कमी असतानाच्या काळात करावयाची देखभाल दुरुस्तीची कामे ऐन उन्हाळ्यात हाती घेऊन सरकारने वीज टंचाईच्या समस्येत भर घातली आहे. ग्राहकाचे वीजबिल थकल्यानंतर त्याची वीज कापणाऱ्या आणि थकबाकीचे कारण देत भारनियमन लादणाऱ्या सरकारच्या अनेक खात्यांकडेच वीजबिलाची हजारो कोटींची थकबाकी असल्याचे स्पष्ट झाले आहे. सरकारच्या बेशिस्तीमुळे वीज मंडळाचा कारभार ढासळला त्यासाठी अभ्यास गट नेमण्याची सूचना राज्य वीज नियामक आयोगाने सरकारला चार महिन्यांपूर्वी केली होती, असेही आ. शेलार यांनी सांगितले.

## थापा मारून दिवस ढकलणे बंद करा

### भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांची टोलेबाजी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पक्षाच्या संवाद यात्रेत सरकारच्या चांगल्या कामांबद्दल किंवा पक्षाच्या विचारसरणीबद्दल बोलण्यासारखे काहीच नाही म्हणून थापा मारून आणि टिंगल टवाळी करून दिवस ढकलणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बंद करावे, असा टोला भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी (दि. २२) लगावला.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, जयंत पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या परिवार संवाद यात्रेत कोल्हापूर येथे पत्रकारांशी बोलताना थापा मारण्याचा उच्चांक केला. काँग्रेस पक्षाने कधीच नाव बदलले नाही म्हणून जयंत पाटील अभिमानाने सांगतात. त्यांनी हे सांगावे की, शरद पवार यांनी १९७८ काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडून येऊन जनता पार्टीच्या मदतीने मुख्यमंत्रिपद मिळवले तो काँग्रेस पक्ष खरा होता की, इंदिरा गांधी यांचा काँग्रेस पक्ष खरा होता ? शरद पवार यांचा काँग्रेस एस हा मूळ काँग्रेस पक्ष होता की, काँग्रेस आय हा मूळ पक्ष होता ? पवारांनी नंतर काँग्रेसमध्ये त्यांचा पक्ष विलीन केला, त्यावेळी कधीही नाव न बदलणारा मूळ काँग्रेस पक्ष कोणता होता ? १९९९ साली पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला त्याला अधिकृत काँग्रेस म्हणायचे का ? शरद पवारांनी ज्या सोनिया गांधींना विदेशी म्हणून विरोध केला आणि नंतर त्यांच्याच नेतृत्वाखालील आघाडीत मंत्री झाली त्यांचा काँग्रेस पक्ष खरा का? इंडियन नॅशनल काँग्रेस नावाचा आणखी एक काँग्रेस पक्ष आहे. नक्की कोणत्या काँग्रेसने नाव बदलले नाही म्हणून सांगता, हे सुद्धा पाटील यांनी स्पष्ट करावे.

पान १ वरून

## विवेक पाटलांवरील आरोप गंभीरच

'पीएमएलए'च्या कलम ४५ अंतर्गत असलेल्या दुहेरी अटींची पूर्तता होत नसल्यामुळे अर्जदार विवेक पाटील यांनी जामिनावर सुटका होणे शक्य नसल्याचे न्यायालयाने निकालपत्रात नमूद केले आहे तसेच अर्जदाराचे वय आणि तुरुंगवासाचा दीर्घ कालावधी या दोन्ही बाबी 'पीएमएलए' २००२ अंतर्गत जामीन मंजूर करण्यासाठी विचारात घेण्यासाठीचे आवश्यक घटक नाहीत, असेही न्यायालयाने निकालपत्रात नमुद केले आहे.

विवेक पाटील हे कर्नाळा नागरी बँकेबरोबरच कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीचेही अध्यक्ष आहेत तसेच 'ईडी'ने केलेल्या तपासात विवेक पाटील यांनी कर्नाळा बँकेतीले पैसे अनधिकृतरीत्या इतर अनेक खात्यांत वळवल्याचे समोर आले आहे. त्यात कर्नाळा महिला रेडिमेड गारमेंट्स, दैनिक कर्नाळा वृत्तपत्र, शंकर पार्वती इन्फ्रा वर्ल्ड प्रा. लिमिटेड, विवेक ऑटोमोबाईल्स, आस्वाद पेट्रोलियम आणि अभिजित विवेकानंद पाटील यांच्या खात्यांवर पैसे वळविण्यात आले आहेत.

## पनवेल मनपाने ग्रामीण भागातील कर भरणा सवलत वाढवावी

दुसरीकडे यापूर्वी वसाहतींमधील मालमत्ता कर भरण्यासाठी एक महिन्यात भरल्यास १५% सवलत, तीन महिन्यांत भरल्यास १०%, तर नऊ महिन्यांत म्हणजेच ३१ मार्चपर्यंत भरल्यास ५% कर सवलत दिलेली होती. ते पाहता ग्रामीण भागासाठी दुजाभाव होऊ नये, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

आयुक्तांना निवेदन देतेवेळी उपमहापौर सीताताई पाटील, ज्येष्ठ नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, नगरसेविका रूचिता लोंढे उपस्थित होते.


## जाहीर सूचना

**अ) मालक/डेव्हलपर्स – राकेश कुमार श्रीवास्तव**
**पत्ता –** प्लॉट नं. १, रसेश्वर सोसायटी, सेक्टर १५, सीकेटी शाळेसमोर, नवीन पनेवल, ता. पनवेल, रायगड – ४१०२०६

**आर्किटेक्ट – विस्तार अर्किटेक्ट अॅन्ड प्लॅनर्स**
**पत्ता –** श्री नंदधाम ए/५०५/५०६, प्लाट नं. ५९, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

**आरसीसी कन्सल्टंट – वास्तूकल्प**
**पत्ता –** सुशिल प्राईड, पहिला मजला, प्लॉट नं. ६७/१, गार्डन हॉटेलजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड

**कॉन्ट्रक्टर – गुप्ता कन्ट्रक्शन (प्रोप्रा. उमेशचंद गुप्ता)**
**पत्ता –** श्रीकृष्ण कमळादेवी, अपमिट ३०२, थर्ड फ्लोअर प्रभू आळी, पनवेल, ता, पनवेल, जि. रायगड

**ब) सर्व्हे नं. ३/३ब, गाव केवाळे, ता. पनवेल**
पश्चिम – हरिग्राम रस्ता लागून
पूर्व – फॉर्चुन कॉलनी
उत्तर – बेलेजा कॉलनी
दक्षिण – फॉर्चुन कॉलनी

**क) ऑर्डर नं.**
सिडको/नैना/पनवेल/केवाळे –**BP-00345/ACC/2022/0198**
परवानगी दिनांक १९/०४/२०२२

**ड) एफ.एस.आय. परमीटेड – १३७८.१८**
एफ.एस.आय – १
इ–रहिवासी गृहसंस्था – ३२
१ बीएचके – २४
१ आरके –८
गाळा – १२

**ई) अप्रुव्ह प्लॅन पाहणीकरीता वरील ऑफिसच्या पत्यावर उपलब्ध आहे.**

**सही/–**
**आर. के. श्रीवास्तव**
मो. नं. ९८२००१९३६६
**पत्ता :** प्लॉट नं. १, रसेश्वरर सोसायटी, सेक्टर–१५, सीकेटी शाळेसमोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६



**पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी**




**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शनिवार, दि. २३ एप्रिल २०२२ रोजी होणारे**

## कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, कळंबोली ■ ८. उपजिल्हा रूग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

### Precautionary Dose बाबत माहिती

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरीकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने (३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पूर्वीप्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८–५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरीकांचे दसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरीकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८–५९** वय नागरीकांचे Precautionary Dose हे **फक्त खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल.
- या लसीकरणाकरीता **कुठलेही नविन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८–५९** वय नागरीकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोस चे सर्टिफिकेट/ दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोस करीता दिलेला मोबईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे. लागणार आहे. मामाजबाबदारा
- नागरिकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.
- लाभार्थ्यांना कोविन अॅपवर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे त्याप्रमाणे कोविन अॅपवर वर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.

# सीडब्ल्यूसी हिंद टर्मिनल लॉजिस्टिकच्या ६०० कामगारांचा प्रश्न मार्गी

## आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने केंद्रीय उद्योगमंत्री पीयुष गोयल यांच्यासोबत बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीडब्ल्यूसी हिंद टर्मिनल कोणत्याही परिस्थितीत बंद पाडू नका, असे निर्देश केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयुष गोयल यांनी सीडब्ल्यूसी लॉजिस्टिक पार्क (हिंद टर्मिनल)चे डायरेक्टर अमित कुमार यांना दिले आहेत. हिंद टर्मिनल लॉजीस्टिकमधील ६०० कर्मचाऱ्यांवर कोणत्याही परिस्थितीत अन्याय होऊ नये यासाठी केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्यासोबत उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने दिल्ली येथे गुरुवारी (दि. २१) बैठक पार पडली. त्यामुळे ६०० कामागारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागला आहे.



उरण तालुक्यातील भेंडखळ येथे असलेल्या सीडब्ल्यूसी लॉजीस्टिक पार्क (हिंद टर्मिनल)मधील कामगारांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून केंद्रीय मंत्री पीयुष गोयल, सीडब्ल्यूसी लॉजीस्टिक पार्क (हिंद टर्मिनल)चे डायरेक्टर अमित कुमार यांची बैठक घडवून देत ६०० कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे आमदार महेश बालदी यांनी अधोरेखित केले. एवढ्या कामगारांच्या रोजी रोटीचा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण होईल हा विषय आमदार महेश बालदी यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिला.

या वेळी झालेल्या चर्चेनुसार कंपनीचे व्यवस्थापक यांना मंत्री पीयुष गोयल यांनी कोणत्याही परिस्थितीत ही कंपनी बंद पडून देऊ नका आणि या कामगारांवर उपासमारीची वेळ देऊ नका, अशी सूचनावजा निर्देश दिले. या बैठकीला मिलिंद पाटील, कृष्णा ठाकूर, लंकेश ठाकूर, अभिजित पाटील आदी उपस्थित होते. आमदार महेश बालदी यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे झालेली ही बैठक कामगारांच्या दृष्टिकोनातून सकारात्मक झाली. त्यामुळे कामगारांना दिलासा मिळाला आहे. या कामगारांनी आमदार महेश बालदी यांचे आभार मानले.

# खारघरमध्ये श्री गाडगेबाबा धर्मशाळेचे उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

कै. सतीश हावरे यांच्या स्मरणार्थ उज्ज्वला सतीश हावरे यांनी खारघर सेक्टर २० येथे रूग्णसेवेसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिलेल्या शारदा सदन इमारतीमध्ये श्री गाडगेबाबा धर्मशाळा सुरू करण्यात आली आहे. या धर्मशाळेचे उद्घाटन राज्याच्या महिला व बालविकासमंत्री यशोमती ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. २१) करण्यात आले.



या कार्यक्रमास हावरे इंजिनिअर्स ॲण्ड बिल्डर प्रा.लि.च्या उज्ज्वला हावरे, श्री गाडगे महाराज मिशनचे कार्याध्यक्ष मधुसूदन मोहिते, उपाध्यक्ष उत्तमराव देशमुख, सचिव विश्वनाथ नाचवणे, सचिव सचिन घोंगटे, खजिनदार ज्ञानदेव महाकाळ, अशोक पाटील, गाडगे महाराजांचे त्या काळातील चालक ९३ वर्षीय भाऊराव काळे, प्रवीण हावरे, नगरसेविका नेत्रा पाटील, भाजप शहराध्यक्ष ब्रिजेश पटेल आदी उपस्थित होते. तत्पूर्वी या संस्थेसाठी रूग्णसेवा गाडी देण्यात आली. त्याचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

### मान्यवरांची उपस्थिती

या वेळी बोलताना महिला व बालविकास मंत्री यशोमती ठाकूर यांनी सांगितले की, गाडगेबाबांच्या तत्त्वाला मानणाऱ्या अनेक व्यक्ती या समाजात त्यांच्या विचाराने प्रेरित आहेत. त्यामुळे देशाला चांगले दिवस येणार आहेत यात शंका नाही. आज अनेकांकडे पैसा आहे, पण पैसे खर्च करणे त्यांच्याकडे दानत नाही, परंतु हावरे कुटूंबीय याला अपवाद असल्याचे सांगितले तसेच त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्याचे कौतुक केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, दररोज वेगवेगळे कार्यक्रम करीत असतो, परंतु त्या कार्यक्रमांपैकी एखादा कार्यक्रम कायम स्मरणात राहतो. त्यातील आजचा कार्यक्रम आहे. आजचा दिवस खऱ्या अर्थाने प्रेरणा असून या कामाचे अनुकरण प्रत्येकाने करून संत गाडगे महाराजांचा आदर्श सर्वांनी डोळ्यासमोर ठेवला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

उज्ज्वला हावरे म्हणाल्या की, आज मला स्वप्नपूर्ती झाल्याचा आनंद होत आहे. ही वास्तू म्हणजे एक मनाला समाधान देणारी वास्तू असून या ठिकाणी ६२ बेडची व्यवस्था केली आहे. अशा प्रकारच्या कार्यामुळे नवनवीन काम करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्याध्यक्ष मधुसूदन मोहिते यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, १९५२मध्ये गाडगे महाराज मिशनची स्थापना केली असून लोकांची व गोरगरीबांची सेवा करा, भूकेलेल्यांना अन्न द्या, गरजूंना शिक्षण द्या हा मानवतेचा संदेश गाडगेबाबांनी आम्हाला दिला आहे. त्याचे आचरण आम्ही करीत असून संपूर्ण महाराष्ट्रात संस्थेमार्फत काम सुरू आहे.

# कोविड काळातील डॉक्टरांचे काम कौतुकास्पद –आमदार महेश बालदी

## उरण येथे आरोग्य मेळावा; ७५८ रुग्णांची तपासणी

**उरण : वार्ताहर**

गोरगरीब रूग्णांची सेवा करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. कोविडच्या काळात सर्व डॉक्टरांचा एकमेकांसोबत समन्वय चांगला होता. त्यामुळेच सर्वांनी चांगले काम केले. त्यात मेडिकल असोशिएशन, सर्व डॉक्टर टीमने चांगले काम केले आहे. सर्वांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो, असे प्रतिपादन आमदार महेश बालदी यांनी आरोग्य मेळाव्यात केले.





*या मेळाव्यात बालरोग ८८, अस्थिरोग ९६, स्त्रीरोग ५२, दंत ६२, कान– नाक –घसा २०, नेत्रचिकित्सा १०७, सर्जरी ४५, त्वचा १०८, फिजिशियन ९४ ,आणि सर्व जनरल रुग्ण एकूण ७५८ रुग्णांची तपासणी केल्याची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी राजेंद्र इटकरे यांनी दिली.*

महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ग्रामीण रुग्णालयातर्फे आरोग्य मेळाव्याचे शुक्रवारी (दि. २२) रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५पर्यंत सिडको प्रशिक्षण केंद्र बोकडवीरा येथे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आमदार बाळाराम पाटील यांनी भूषविले. या वेळी गटविकास अधिकारी निलम गाडे, उरण पं. स. सभापती, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक गौतम देसाई, प्राथमिक आरोग्य केंद्र अधिकारी डॉ. राजाराम भोसले, शिक्षण अधिकारी के. बी. अंजने, बालविकास प्रकल्प अधिकारी प्रवीण पाटील, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, नगरसेवक कौशिक शाह यांच्यासह एमजीएम मेडिकल कॉलेजचे डॉक्टर, तेरणा मेडिकल कॉलेज नेरूळचे डॉक्टर, उरण मेडिकल असो. चे डॉक्टरउपस्थित होते.

# पनवेल मनपा क्षेत्रातील शाळांमध्ये जंतनाशक दिनी विशेष मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका क्षेत्रात २५ एप्रिल रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त एक ते १९ वर्ष वयोगटातील सर्व मुलामुलींना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे. महापालिका क्षेत्रातील सर्व लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने महापौर डॉ. कविता चौतमाल यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागातर्फे राष्ट्रीय जंतनाशक दिनी २५ एप्रिल रोजी महापालिका क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये विशेष मोहीम राबविली जाणार आहे. यामध्ये एक वर्षापासून ते १९ वर्षे वयोगटांतील मुलामुलींना जंताच्या आजाराचा सामना करण्यासाठी २५ एप्रिल ते २ मे या काळात राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे. या अंतर्गत सर्व शासकीय शाळा, महापालिका शाळा, अंगणवाड्या, सर्व कनिष्ठ विद्यालये, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी या सर्वांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे.



महापालिका आरोग्य विभागाच्या आरसीएच अधिकारी डॉ. रेहाना मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाच्या विविध टिमच्या माध्यमातून जंतनाशक गोळ्यांचे वाटप केले जाणार आहे.

### काय आहे जंतदोष?

***खाण्यातून विविध प्रकारचे जंतू लहान मुलांच्या पोटात जातात. या जंतूंमुळे अन्नतील पौष्टिक सत्व मुलांच्या शरीराला मिळत नाहीत. त्यामुळे मुलांचा शारीरिक विकासही खुंटतो तसेच विष्ठेद्वारे जंत बाहेर पडू लागतात. त्यामुळे मूले आजारी पडतात.***

**राष्ट्रीय जंतनाशक दिनाचा उद्देश हा एक ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुलामुलींना जंतनाशक गोळी देऊन त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे हा आहे. प्रत्येक पात्र मुलामुलींनी २५ एप्रिल रोजी जंतनाशक गोळी जरूर घ्यावी.**
**–डॉ. आनंद गोसावी, मुख्य वैद्यकीय अधिकारी**



**पनवेल : न्हावेखाडी मोठापाडा येथील श्री गावधनी यात्रा व पालखी सोहळ्यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी देवाचे दर्शन घेतले. या वेळी न्हावे उपसरपंच मंजुषा ठाकूर, भाजप कोपर अध्यक्ष सुधीर ठाकूर, किशोर पाटील, अपूर्व ठाकूर, गोपीचंद ठाकूर, शंभो ठाकूर, हरेश्वर कडू, अनंता ठाकूर, धर्मा ठाकूर, रुपेश मोकल, ध्रुव तांडेल, वैभव म्हात्रे, केशव म्हात्रे, सतिश ठाकूर, सुजित ठाकूर, मनोज घरत, जगदिश ठाकूर, राम म्हात्रे, निलेश ठाकूर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : न्हावेखाडी मोठापाडा येथील श्री गावधनी महिला मंडळाच्या मागणीनुसार संपूर्ण गावात पाण्याची लाईन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वखर्चाने दिली. याबद्दल महिला मंडळातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.**





**पनवेल : सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुक्रवारी कामोठे नौपाडा येथील नाल्यांच्या कामांसंदर्भात पाहणी केली तसेच अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. या वेळी पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती 'क'च्या सभापती अरुणा भगत, नगरसेवक गोपीनाथ भगत, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर, एस. के. भगत, पिंट्या भगत, वासुदेव भगत आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांचे स्वीय सहाय्यक अनिल कोकाटे यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी शुभेच्छा दिल्या. या वेळी उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, दत्ता राजे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : नगरसेवक व भाजप प्रवक्ते प्रकाश बिनेदार यांनी आपल्या नगरसेवक निधीतून प्रभाग क्रमांक १७मधील एसटी डेपो, शिवाजीनगर वसाहत, भगत चाळ, लोकमान्य नगर, मालधक्का, नवनाथनगर वसाहत, रेल्वेस्थानक रोड, कोकण फुड, साईबाबा मंदिर रोड, आदई सर्कल, सिडको गार्डन, संत साईबाबा शाळा नवीन पनवेल आदी ठिकाणी सिमेंटचे बेंच बसवून दिले. यासाठी रावसाहेब खरात, राहुल वाहुळकर, अशोक आंबेकर, नंदा टापरे, जरीना शेख, आनंद जाधव, गोरख खवले, गोपाल पट्टे यांनी सहकार्य केले.**



# नवी मुंबई भाजपतर्फे सामाजिक पंधरवडा उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई भारतीय जनता पक्षातर्फे सामाजिक न्याय पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन सिवूड्स सेक्टर ४६ शनेश्वर मंदिर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात देशभक्तीपर गीत गायले गेले तसेच स्वातंत्र्यसैनिकांचे कुटूंबीय, माजी अधिकारी, सैनिक, सध्या सीमेवर कर्तव्य बजावत असलेले सैनिकांच्या कुटूंबीयांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे संयोजन दत्ता घंगाळे व भाजप युवा मोर्चाचे सर्व पदाधिकारी यांच्या वतीने करण्यात आले होते.

# ऊर्जा वाचवा, पृथ्वी वाचवा –सुप्रिया देशपांडे

**नवी मुंबई : वार्ताहर**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शैक्षणिक संकुलात विद्युत अभियंत्या सुप्रिया देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय शिक्षकांसाठी ऊर्जा संवर्धन प्रशिक्षण घेण्यात आले.

ऊर्जेची निर्मिती करण्यासाठी लागणाऱ्या गोष्टी, कार्यक्षमतेने वापर, अतिरिक्त वापर, कार्बन उत्सर्जन, सीएफसी गॅसचा धोका, हरितगृह परिणाम यावर सुप्रिया देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. ऊर्जा बचत कारणे म्हणजे आपल्या सुंदर पृथ्वीला वाचवणे हे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रशिक्षणासाठी पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक दिनेश मिसाळ, ज्येष्ठ नागरिक संघ ग्रंथालयाचे ग्रंथपाल प्रकाश लखापते, किरण देशपांडे, मुख्याध्यापक शिवाजी माळी, सुवर्णा मिसाळ, मनीषा मुळीक, राजकुमारी इंदलकर, अस्मिता सलगर, सर्व शिक्षक उपस्थित होते.

## संपादकीय

# भीमरूपी महारुद्रा

पवनसुत हनुमंताचे नाव घेताक्षणी रामभक्तांच्या अंगावर भक्तिभावाने रोमांच उभे राहतात तर काही राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या अंगावर काटा उभा राहतो असे चित्र आता महाराष्ट्रात दिसू लागले आहे. हनुमान चालिसा या स्तोत्राची इतकी नावड शिवसेनेमध्ये कशी उत्पन्न झाली हे आता रहस्य उरलेले नाही.

ज्या पक्षांसोबत शिवसेना सत्तेमध्ये खुर्चीला खुर्ची लावून बसली आहे, त्या पक्षांना हिंदु देवादिकांबद्दल फारशी आस्था नाही हे आजवर अनेकदा दिसले आहे. तथापि सध्या अमरावतीच्या राणा दाम्पत्याने महाविकास आघाडीमध्ये जी घबराट उडवली आहे, त्याने मात्र महाराष्ट्रातील मतदारांचे चांगलेच मनोरंजन होत असेल. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी गुढीपाडव्याच्या दिवशीच्या सभेत मशिदींवरील भोंग्यांचा मुद्दा उचलून धरला होता. हे भोंगे उतरवले नाहीत तर दुप्पट आवाजात हनुमान चालिसाचे पठण करून सडेतोड उत्तर देण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला होता. त्यानंतर काही ठिकाणी मनसेच्या कार्यकर्त्यांनी भोंगे लावून हनुमान चालिसाचा कार्यक्रमही उरकला. इतकेच नव्हे तर दादर येथील शिवसेना भवनासमोर टेम्पो उभा करून मनसेच्या कार्यकर्त्यांनी हनुमान चालिसा वाजवण्याची खोडी काढली होती. मनसेच्या कार्यकर्त्यांचे हे कृत्य पाहून शिवसैनिक खवळले नसते तरच नवल. परिणामी, हनुमान चालिसाचे पठण हा अल्पावधीतच लोकप्रिय राजकीय मुद्दा बनला. वास्तविक भोंग्यांच्या प्रश्नी भारतीय जनता पक्षाने कुठल्याही प्रकारची प्रतिक्रिया दिली नव्हती. तरीही राज ठाकरे यांच्या हनुमान चालिसा म्हणण्याच्या आग्रहामागे भाजपचाच हात असावा असा संशय महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या मनात घर करून आहे. त्यातच अमरावतीचे आमदार रवी राणा आणि त्यांच्या पत्नी खासदार नवनीत राणा यांनी मुंबईतील मातोश्री या मुख्यमंत्र्यांच्या खासगी निवासस्थानासमोर जाऊन हनुमान चालिसाचे पठण करण्याची घोषणा केली. नुसती घोषणा करून ते थांबले नाहीत. शिवसैनिकांना हुलकावणी देत त्यांनी मुंबईत प्रवेश केला हे कळल्यानंतर शिवसैनिकांचे धाबे दणाणले. हे दाम्पत्य ठरवल्याप्रमाणे खरोखरीच मातोश्रीसमोर प्रकट झाले असते तर शिवसेनेची नाचक्की झाली असती अशी भावना त्यांच्या नेत्यांच्या मनात बळावली आहे. म्हणूनच राणा दाम्पत्याच्या खार येथील निवासस्थानी जाऊन मुंबई पोलिसांनीच ठिय्या मांडला आणि त्यांच्यावर प्रतिबंधात्मक नोटीस बजावली. कुठल्याही परिस्थितीत शनिवारच्या पवित्र दिवशी आम्ही मातोश्री येथे जाऊन हनुमान चालिसाचे पठण करणारच असा निर्धार पत्रकार परिषदेत या दाम्पत्याने व्यक्त केला. त्याव्यतिरिक्त त्यांनी शिवसेना पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर असे काही टीकास्त्र सोडले की, त्यापेक्षा त्यांनी हनुमानचालिसा वाचला असता तर बरे झाले असते असेच शिवसेना नेत्यांना वाटले असेल. राणा दाम्पत्याचे हे अनोखे आंदोलन दिवसभर प्रसिद्धीमाध्यमांमध्ये गाजत होते. त्यांच्या निर्धारामुळे अस्वस्थ झालेल्या शिवसैनिकांनी मातोश्री येथे गर्दी केली. आता पुढील काही दिवस राणा दाम्पत्याला घाबरून मातोश्रीच्या भोवती शिवसैनिकांचा जागता पहारा बसेल हे वेगळे सांगायला नको. खुद्द मुख्यमंत्रीच आपले वर्षा निवासस्थान सोडून मातोश्रीवर गेले, इथेच राणा दाम्पत्याने निम्मी राजकीय लढाई जिंकली आहे असे म्हणावे लागेल. आमच्या आंदोलनाशी भाजपचा संबंध जोडू नका असे राणा दाम्पत्याने स्पष्ट केले असले तरी या साऱ्या नाट्याच्या पाठीमागे भाजपचाच हात आहे असे महाविकास आघाडीला वाटते. त्यांची हनुमान चालिसाबद्दलची अनास्था देखील राजकीयच आहे.

# पालीतील वाहतूककोंडीचा तिढा सुटणार कधी?



**खबरबात**
धम्मशील सावंत

सुट्ट्यांमध्ये अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात मोठ्या प्रमाणात भाविक व पर्यटक दाखल होत आहेत. भाविक व पर्यटकांची वाहने, तसेच इतर अवजड वाहने व डंपर यामुळे शहरात ठिकठिकाणी वाहतूककोंडी जटील होत आहे. दिवसा आणि रात्री देखील कोंडी होत असते. परिणामी पर्यटक, भाविक व नागरिक अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत. पाली हे तालुक्याचे ठिकाण आहे. परिणामी अनेक लोक कामानिमित्त व विद्यार्थी शाळा व कॉलेजमध्ये येत असतात. परिणामी कोंडीमुळे वाहनचालक, भाविक, पादचारी व विद्यार्थ्यांची येथून वाट काढतांना मोठी गैरसोय होते.

अरुंद रस्ते व भाविकांची वाहने यामुळे वाहतूककोंडीची समस्या अधिक गंभीर झाल्याचे दिसून येते. वाहतूक कोंडीने डोकेदुःखी वाढली आहे. यावर ठोस उपाय निघत नसल्याने सारे त्रासले आहेत. यात अवजड वाहतूक त्रासदायक ठरत आहे. अनेकदा रुग्णवाहिका या वाहतूककोंडीत अडकत असल्याने मोठी अडचण निर्माण होत आहे. रुग्ण वेळेत पुढील दवाखान्यात पोहचण्यास विलंब होत आहे. पालीत सातत्याने होणाऱ्या वाहतूककोंडीवर रामबाण उपाय असलेला बायपास (मार्ग) दिवसेंदिवस अडचणीत आहे. या समस्येवर पेण सुधागड रोहा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधिमंडळात प्रश्नोत्तर चर्चेदरम्यान प्रश्न उपस्थित केला होता. पाली शहरातील वाहतूक समस्येमुळे येथील रस्ते हे एकेरी करण्यात आले असून श्री बल्लाळेश्वर मंदिर येथे व विळे भागाड माणगावकडे जाणाऱ्या या वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या मुळे पाली शहरातील वाहतूक समस्या ही जटील होत चाललेली आहे. वाहतूक समस्येचा स्थानिक प्रवाशांना तसेच भाविकांना त्रास न होणेकरिता शहरातील महत्त्वाचे नाके येथे प्रशासनाकडून वाहतूक पोलीस कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येत असते. पाली शहरास वर्तुळाकृती बाह्यवळण रस्ता असा रस्ता कोणत्याही योजनेतून मंजूर नाही मात्र पाली पाटणूस रस्ता रा.मा. ९४ या रस्त्यास पर्यायी रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत प्रस्तावित आहे. पाली पाटणूस रस्त्यास पर्यायी पाली गावातून वळण रस्ता करणे कि. मी. ००/०० ते ३/०० या कामाकरिता जमीन भूसंपादन करणे या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. पाली गावास पाली पाटणूस रस्ता रा.मा ९४ या रस्त्यास पर्याय रस्ता करणे या कामास प्रशासकीय मान्यता असून सदर कामासाठी लागणाऱ्या जागेची भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. भूसंपादन करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाही शक्य असल्याचे मंत्री यांनी स्पष्ट केले होते. मात्र अद्याप पाली बायपास मार्ग प्रक्रियेला कोणत्याही प्रकारची गती मिळताना दिसत नाही. परिणामी भूसंपादनच होत नसेल तर बायपासचे काम कधी पूर्ण होणार असा सवाल उपस्थित होतोय. दरम्यान पालीत सण व उत्सवात देखील हजारोंच्या संख्येत भाविक व त्यांची वाहने पालीत दाखल होताना दिसतात. त्यामुळे येथे वारंवार वाहतूककोंडी होत आहे. भाविक, पादचारी व विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. पालीच्या बाहेरुन बलाप गावापासून पर्यायी (बायपास) मार्गाला मंजुरी असुनही हा बाह्यवळण(बायपास) मार्ग लालफितीत अडकला आहे. पालीला वाहतूककोंडीचे ग्रहण लागले आहे. त्याचप्रमाणे परळी बाजारपेठ देखील सतत वाहतूककोंडीच्या विळख्यात सापडलेली दिसते. या वाहतूक कोंडीतून सुटका होईपर्यंत सारेच रडकुंडीला येताना दिसताहेत. खासगी, अवजड व लक्झरी वाहनांची ये-जा, नियमांचे उल्लंघन करणारे चालक, अरूंद रस्ते व रस्त्याच्या दुतर्फा लावलेली वाहने व बांधकामे यामुळे पालीत सतत वाहतूककोंडी असते. सुट्ट्यांच्या काळात तर मोठ्या प्रमाणात पर्यटक व भाविक पालीत दाखल होत आहेत.

या वाहनांमुळे पालीतील वाहतुकीवर प्रचंड ताण येवुन वारंवार अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. या समस्येचे निराकरण करण्याच्या दृष्टिकोनातून लोकप्रतिनिधी व प्रशासनाने लक्ष देण्याची गरज वर्तविली जात आहे. पालीत दुर्घटना घडण्याची शक्यता देखील आहे. अलिकडेच एकाला पालीत एक डंपर घासून गेला. या संदर्भात या व्यक्तीने तहसीलदार दिलीप रायण्णावार यांच्याकडे तक्रार केली आहे.

## वाहतूककोंडी होणारी ठिकाणे

बल्लाळेश्वर मंदिर ते ग.बा. वडेर हायस्कूल, मारुती मंदिर चौक ते जुने एस.टी.स्टँड, गांधी चौक ते बाजारपेठ, कुंभारआळी, बँक ऑफ इंडिया, हटाळेश्वर चौक ते मिनिडोअर स्टँड, एसबीआय बँक ते गांधी चौक अशा विविध ठिकाणी नियमित वाहतूककोंडी होते.

## कोंडीची कारणे

पालीत डंपर, ट्रॅक्टर व लक्झरी वाहनांची नियमीत ये-जा सुरु असते. यामुळे वाहनांना येण्या-जाण्याचा मार्ग मिळत नाही. तसेच नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालक देखील वाहतूककोंडीत भर घालतात. पालीतील रस्ते हे खूप अरूंद आहे. अशा अरुंद रस्त्याच्या दुतर्फा अनेकजण आपली दुचाकी व मोठी वाहने पार्क करतात आणि खरेदी किंवा इतर कामासाठी जातात. अनेक दुकाने, टपर्या व इमारती रस्त्याच्या अगदी कडेला आहेत. काही ठिकाणी तर अनधिकृत बांधकामे देखील बांधली गेली आहेत. याबरोबरच रस्त्याच्या बाजुला सुरु असलेली बांधकामे आणि या बांधकामांचे साहित्य रस्त्यावर पडलेले असते या मुळे येथून मार्ग काढणे वाहनचालकांना शक्य होत नाही. यामुळे देखील पालीत सतत वाहतूककोंडी होत असते. तसेच सुट्ट्यांच्या काळात तर मोठ्या प्रमाणात पर्यटक व भाविक पालीत दाखल होत असतात. या वाहनांमुळे पालीतील वाहतुकीवर प्रचंड ताण येवुन वारंवार अनेक ठिकाणी वाहतूककोंडी होत आहे. वाहतूककोंडी सोडविण्यासाठी विविध नाक्यांवर पोलीस तैनात असतात. विविध कारणांमुळे कोंडी जटिल होत आहे.

## इतर वाहनांची वर्दळ

मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था आणि वाहतूककोंडी या मुळे मुंबईवरून कोकणकडे जाणारे प्रवासी पालीतून विळेमार्गे माणगाववरुन किंवा वाकण वरून पुढे जातात. तसेच कोकण कडून येणारी वाहने माणगाववरुन विळे मार्गे पालीतून खोपोलीमार्गे पुणे-मुंबईकडे जातात. परिणामी पालीत वाहनांची रेलचेल वाढून अधिक वाहतूककोंडी होते. बाह्यवळण मार्ग निर्माण झाल्यास ही वाहने पालीच्या बाहेरूनच निघून जातील. या मुळे वाहतूक सुरळीत होऊ शकते.

## बाह्यवळण मार्ग ठरेल वरदान

राज्यशासनाने सन २०१० या वर्षी पाली बाह्यवळण मार्गाला मान्यता दिली आहे. तसेच रस्त्यास १८ कोटी तर भूसंपादनासाठी १० कोटींची मंजुरी मिळाली होती. सदरचा मार्ग हा वाकण पाली मार्गावरील बलाप येथून पाली पाटणूस राज्यमार्ग ९४ ला जोडला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने खासगी एजन्सीद्वारे मार्गाचा प्लॅन फायनल केला आहे. त्यानुसार रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी त्यास मान्यता देवून प्रांत अधिकाऱ्यांना जमीन अधिग्रहणाच्या सुचना दिल्या होत्या. या मार्गात येणाऱ्या शेकडो शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनी नष्ट होणार असल्याने शेतकरीवर्गात संतापाची लाट उसळली आहे. त्यांचा या मार्गाला विरोध आहे. परिणामी विविध कारणांमुळे मार्गाचे काम रखडले आहे. बाह्यवळण मार्ग झाल्यास येथील कोंडी फुटू शकेल.



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅपवर फेक न्यूज ओळखायची कशी?

कोविडच्या काळात व्हॉट्सअ‍ॅपवर खोट्या बातम्या पाठविण्यात आल्या होत्या आणि तरीही आजच्या काळात तात्कालीन घडामोडींची दिशाभूल करणारे संदेश प्रसारित केले जात आहेत. हे लक्षात घेऊन आज आम्ही तुम्हाला फेक न्यूज कशी ओळखता येईल याबद्दल माहिती देणार आहोत.

व्हॉट्सअ‍ॅप हे जगातील लोकप्रिय मेसेजिंग अ‍ॅप आहे. ज्याचा वापर युजर्स एकमेकांशी चॅट करण्यासाठी आणि वैयक्तिक माहिती शेअर करण्यासाठी करतात. मात्र, आजकाल व्हॉट्सअ‍ॅपवर फेक न्यूज आणि चुकीची माहितीही वेगाने पसरवली जात आहे. पण, मेसेजिंग अ‍ॅपवरून खोट्या बातम्या पसरविण्याबाबत अलर्ट केले जातात. कोविडच्या काळात व्हॉट्सअ‍ॅपवर खोट्या बातम्या पाठवण्यात आल्या होत्या आणि तरीही आजच्या काळात तात्कालीन घडामोडींची दिशाभूल करणारे संदेश प्रसारित केले जात आहेत. हे लक्षात घेऊन आज आम्ही तुम्हाला फेक न्यूज कशी ओळखता येईल याबद्दल माहिती देणार आहोत.



भारतातील किमान १० तथ्य तपासणी संस्थांकडे व्हॉट्सअ‍ॅप टिपलाइन उपलब्ध आहेत, जेणेकरून युजर्स कोणतीही दिशाभूल करणारे संदेश सहजपणे तपासू शकतील. इंटरनॅशनल फॅक्ट-चेकिंग नेटवर्क (IFCN) द्वारे या टिपलाइन पडताळून घेतल्या जातात. फोटो, व्हिडीओ आणि व्हॉइस रेकॉर्डिंगसह संभाव्य दिशाभूल करणारे संदेश पडताळण्यासाठी वापरली जाऊ शकतात. ही तपासणी इंग्रजी, बंगाली, हिंदी, मराठी आणि पंजाबीसह ११ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध आहे. या टिपलाइन्सच्या मदतीने तुम्ही फेक न्यूज ओळखू शकता.

तथ्य तपासणी टिप्स कशा वापरायच्या-तुम्हाला हे नंबर तुमच्या मोबाईलमध्ये सेव्ह करावे लागतील. यानंतर तुम्ही त्यांना मेसेज करून तपासात असलेल्या माहितीची माहिती देऊ शकता. कृपया लक्षात घ्या की चाचणीसाठी तुम्हाला काही काळ प्रतीक्षा करावी लागेल. व्हॉट्सअ‍ॅप फॅक्ट चेकसाठी टिपलाईन युजर्सकडून फोटो आणि व्हिडीओ तसेच व्हॉइस आणि टेक्स्ट मेसेजच्या रूपात मिळालेली संभाव्य दिशाभूल करणारी माहिती मागवतात.

# स्त्रियांना व्यासपीठ देणाऱ्या पंडिता रमाबाई

**पंडिता रमाबाई यांनी स्त्रियांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी आपले आयुष्य अर्पण केले. शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणा हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यांचा आज २३ एप्रिल हा जन्मदिवस आहे, यानिमित्ताने...**



**पूर्ण नाव - पंडिता रमाबाई सरस्वती**
**जन्माचे नााव - रामा डोंगरे**
**आई - लक्ष्मीबाई डोंगरे**
**वडील - अनंत शास्त्री डोंगरे**
**जन्मतारीख - २३ एप्रिल १८५८**
**जन्म ठिकाण - कॅनरा जिल्हा**
**मृत्यू-५ एप्रिल १९२२**

एकोणिसाव्या शतकात भारतात, स्त्रियांची, विशेषत बालविवाहाला बळी पडलेल्या तरुण विधवांची स्थिती दयनीय होती. ज्या काळात कोणत्याही पुरुषाला स्त्रियांच्या बाजूने उभे राहणेही अवघड होते, त्या काळात पुरुषप्रधान समाजाला तोंड देण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रीला किती त्रास आणि प्रतिकार करावा लागला याची कल्पना करता येते. पंडिता रमाबाई सरस्वती या भारतीय समाजसुधारक होत्या. ज्यांनी महिलांच्या मुक्तीचं नेतृत्व केले आहे.

कलकत्ता विद्यापीठाने संस्कृत विद्वान म्हणून पंडिता आणि सरस्वती या पदव्या बहाल केलेल्या त्या पहिल्या महिला होत्या. त्यांचे बालपण आणि प्रारंभिक जीवन असे होते. पंडिता रमाबाई सरस्वती यांचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी संस्कृत विद्वान अनंत शास्त्री डोंगरे आणि त्यांची दुसरी पत्नी लक्ष्मीबाई डोंगरे यांच्या पोटी झाला. त्यांचा जन्म गुंगमाल जंगलात त्यांच्या वडिलांनी चालवलेल्या आश्रमात झाला. जन्मतः त्यांचे नाव रामा डोंगरे होते. त्यांचे कुटुंब चित्पावन ब्राह्मण होते. त्यांच्या बालपणात, त्यांच्या वडिलांनी त्यांना आणि त्यांच्या आईला संस्कृत ग्रंथ शिकवले. रमाबाई जेव्हा सोळा वर्षांच्या होत्या तेव्हा त्यांच्या आई-वडिलांचा दुष्काळामुळे मृत्यू झाला. एकटीच असल्याने त्यांनी त्यांच्या मोठ्या भावासोबत संपूर्ण भारतभर प्रवास करण्याचे ठरवले, पवित्र शास्त्रातून प्रवचन दिले आणि सामाजिक सुधारणेचा प्रचार केला. त्यांनी महिलांची विशेषतः बाल-विधवांची दुर्दशा पाहिली. तेव्हाच त्यांनी आपले जीवन महिलांच्या उन्नतीसाठी समर्पित करण्याचा संकल्प केला.

१८८३मध्ये, पंडिता रमाबाई त्यांच्या मित्र इंग्लिश मिशनरी मिस हर्फोर्डसोबत इंग्लंडला गेल्या आणि त्यांना चेल्तेनहॅम फिमेल कॉलेजमध्ये संस्कृतच्या प्राध्यापिका बनवण्यात आले. तेथे त्यांनी इंग्रजी शिकून उच्च शिक्षण तसेच इंग्रजी साहित्याचाही अभ्यास केला.

१८८६ मध्ये, त्यांना डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या पदवीदान समारंभात उपस्थित राहण्याचे आमंत्रण मिळाले. तेथे त्यांनी महिला वैद्यकीय महाविद्यालयाच्या डीन बोडले यांच्याशी मैत्री केली ज्याने त्यांना अमेरिकेत काम करण्यास प्रोत्साहित केले. पंडिता रमाबाईंना अमेरिकन पब्लिक स्कूल पद्धतीचा अभ्यास करण्याची संधी मिळाली आणि औद्योगिक प्रशिक्षणही मिळाले.

१८८९मध्ये पंडिता रमाबाई सहा वर्षांच्या कालावधीनंतर भारतात परतल्या, त्यांनी महिलांच्या भल्यासाठी त्यांचे धर्मयुद्ध चालू ठेवले. त्यांनी त्यांच्या अमेरिकन अनुभवाबद्दल 'युनायटेड स्टेट्स ची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त' (युनायटेड स्टेट्स ऑफ सोसायटीची स्थिती आणि एक प्रवासवर्णन) नावाच्या पुस्तकात लिहिले. देशात परतल्यानंतर सहा आठवड्यांच्या आत पंडिता रमाबाईंनी मुंबईत शारदा सदन नावाची शाळा स्थापन केली. एक विद्वान स्त्री सात भाषांमध्ये अस्खलित होती, रमाबाई कवयित्री आणि विद्वानही होत्या. त्यांनी मूळ हिब्रू आणि ग्रीकमधून बायबलचे त्यांच्या मातृभाषा मराठीत भाषांतर केले.

पुरस्कार : १८७८ - कलकत्ता विद्यापीठातून बंगालमध्ये पंडित आणि सरस्वती पदवी. १९१९ - ब्रिटीश सरकारने समुदाय सेवेसाठी कैसर-ए-हिंद पदक प्रदान केले. यूएसए मधील एपिस्कोपल चर्चच्या लीटर्जिकल कॅलेंडरवर ५ एप्रिल रोजी त्यांना मेजवानीच्या दिवशी सन्मानित केले जाते. २६ ऑक्टोबर १९८९ रोजी, भारत सरकारने भारतीय महिलांच्या प्रगतीसाठी त्यांच्या योगदानाची ओळख म्हणून एक स्मारक तिकिट जारी केले.

**(साभार-हनुमंत हडूले)**






**क्लिक...क्लिक...!**

**पाली : काही महिन्यांपूर्वी लहानग्यांनी गजबजलेल्या पालीतील एकमेव बालोद्यानाची प्रचंड सध्या दूरवस्था झाली आहे. सद्यस्थितीत हे बालोद्यान अखेरची घटका मोजत असल्याने अनेक नागरिकांनी याबाबत संताप व्यक्त केला आहे. (छाया: गौसखान पठाण)**

## आरोग्य प्रहर



# पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये मायग्रेनचे प्रमाण अधिक

मायग्रेन हा वारंवार उद्भवणारा गंभीर व डोके ठणकवणारा आजार आहे. जो कधी डोक्याच्या एका बाजूला किंवा दोन्ही बाजूंना जाणवतो. मायग्रेनच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. योग्य वेळी या आजारावर उपचार केला पाहिजे. यातच पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये डोकेदुखीची व मायग्रेनचे प्रमाण अधिक असल्याचे अनेक प्रकरणे समोर आली आहेत. संशोधकांच्या म्हणण्यानुसार १७ टक्के महिला मायग्रेनचा त्रास जाणवतो तर पुरुषांमध्ये हे प्रमाण ८.६ टक्के आहे. वैज्ञानिकांनी केलेल्या संशोधनानुसार १५ दिवसात ६ टक्के महिलांना डोकेदुखीचा त्रास जाणवतो. याउलट पुरुषांमध्ये हे प्रमाण २.९ टक्के इतके आहे तर मायग्रेनचे प्रमाण याच्या दुप्पट आहे.

महिलांमध्ये मायग्रेनचे प्रमाण अधिक असल्याचे एक प्रमुख कारण म्हणजे त्यांचे हार्मोनल आरोग्य होय. खरं तर, हार्मोनल आरोग्याशी संबंधित गडबडीमुळे महिलांना अधिक डोकेदुखीचा आणि मायग्रेनचा त्रास होतो. तज्ज्ञांच्या मते महिलांच्या मायग्रेनमध्ये मेन्स्ट्रुअल सायकलची महत्त्वाची भूमिका असते. काही महिलांना पिरेडच्या काळात मायग्रेनचा त्रास होतो. पाळीच्या काळात प्रोजेस्टेरॉन आणि एस्टेरॉन हार्मोन्समधील चढउतार मायग्रेनला ट्रिगर करतात.

सामान्यत: मायग्रेनचा झटका आल्यावर समोरचे न दिसणे, मळमळणे, ओकारी येणे, प्रकाश, आवाज, वास, स्पर्श सहन न होणे, चेहऱ्याला झिणझिण्या आल्यासारखे वाटणे अशी लक्षणेही दिसू शकतात. हा झटका चार तासांपासून ७२ तासांपर्यंत टिकू शकतो. त्यातही हा रोग अत्यंत कार्यशील वयोगटात म्हणजे २५ ते ५५ वयोगटांत जास्त आढळतो. मायग्रेन हा डोकेदुखीचाच एक प्रकार आहे. मायग्रेनमध्ये व्यक्तीच्या डोक्याचा अर्धा भाग दुखतो. या डोकेदुखीचा परिणाम डोळ्यावर नजरेवरही होऊ शकतो. मायग्रेन पीडित असलेले रुग्ण तीव्र-प्रकाश व मोठा आवाजाच्या बाबतीत अधिक सेन्सेटीव्ह असलेले पाहायला मिळते.

# अधिकाऱ्यांना पाजले गढूळ अन् खारे पाणी

## पेण प्रांताधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलनकर्त्या महिला आक्रमक





(छाया : धम्मशील सावंत)

**पाली, पेण : प्रतिनिधी**

शुद्ध व मुबलक पाणी मिळावे या मागणीसाठी भारतीय महिला फेडरेशन व खारेपाट विभागाच्या माध्यमातून गुरुवारी (दि. २१) पेण तालुक्यातील ग्रामस्थांनी प्रांताधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. या वेळी संतप्त आंदोलकांनी उपस्थित अधिकाऱ्यांना गढूळ व खारे पाणी पाजले.

पेण विभागात भरपूर पाऊस पडतो तसेच तालुक्यात हेटवणे, शाहपाडा, बाळगंगा इत्यादी धरणे व जलस्त्रोत आहेत. परंतु तालुक्यातील पाणीटंचाईचा प्रश्न गेली वीस-पंचवीस वर्षे कायम आहे. तालुक्यातील अनेक गावे व वाड्या, वस्त्यांत सद्यस्थितीत पाण्याची भीषण टंचाई आहे. हंडाभर पाण्यासाठी महिला रखरखत्या उन्हात वणवण भटकत आहेत. त्यामुळे संतप्त झालेल्या खारेपाट विभागातील ग्रामस्थांनी शुद्ध व मुबलक पाणी मिळावे या मागणीसाठी भारतीय महिला फेडरेशनच्या माध्यमातून गुरूवारी पेण प्रांताधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. या वेळी संतप्त आंदोलकांनी अधिकाऱ्यांना गढूळ व खारे पाणी पाजले. तुम्ही एक दिवस हे पाणी पिऊ शकत नाही, आम्ही वर्षाचे १२ महिने हे पाणी पितो, आम्ही गुरे ढोरे आहोत का? असा सवाल या वेळी महिलांनी उपस्थित केला.

येथील रखडलेले पाणी प्रकल्प पूर्ण करावेत. हेटवणे ते शाहपाडा वाढीव पाणी प्रकल्प, दक्षिण शाहपाडा कालवा, डावातीर कालवा, बाणगंगा पाणी प्रकल्प त्वरित पूर्ण करावेत. कालवे, धरणांतील व इतर पाणीसाठ्यातील गाळ काढवा, सिडको किंवा जेएसडब्ल्यू असे पाण्याचे कंपनीकरण थांबवून महाराष्ट्र शासन तसेच जीवन प्राधिकरणांकडे सर्व पाण्याचे नियोजन द्यावे, आदि मागण्या या वेळी करण्यात आल्या.

पाणी प्रश्नावर यापूर्वी २ मार्च २०२२ रोजी पाणी महिलांनी आंदोलन केले. त्या वेळी झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार ३१ मार्च ते १५ एप्रिलपर्यंत कामे होतील असे सांगण्यात आले होते. २५ मार्च रोजी १५० महिलांच्या सह्यांचे स्मरणपत्राद्वारे पाणी प्रश्नासंदर्भात पाठपुरावा केला होता. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी प्रकल्पाबाबत सुरू असलेल्या कामाची माहिती मिळावी या मागणी बरोबरच सध्या जो काही अपुरा पाणीपुरवठा होत आहे तो किमान शुध्द मिळावा, अशी विनंती करण्यात आली होती. त्यास प्रशासनाकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. स्थानिक प्रशासनाकडून आमच्या मागण्या पूर्ण होत नसतील तर मंत्रालयावर धडक मारण्याची आम्ही तयारी ठेवली असल्याचे मोहिनी गोरे यांनी सांगितले.

सामाजिक कार्यकर्त्या मोहिनी गोरे, मनसेचे युवा नेते संदीप ठाकूर, विजयभाऊ पाटील, दिलीप पाटील, किरण म्हात्रे, माधुरी ठाकूर, देवेंद्र कोळी, हेमंत पाटील, साक्षी पाटील, अपर्णा म्हात्रे, सुषमा पाटील, रंजिता ठाकूर, चंद्रकांत म्हात्रे आदींसह खारेपाट विभागातील महिला व ग्रामस्थ या ठिय्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, मागणीनुसार जास्तीतजास्त टँकर खारेपाट विभागासाठी देण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन पेणचे गटविकास अधिकारी एम. एन. गडरी यांनी मोहिनी गोरे यांना दूरध्वनीवरून दिले.

**पाणीपुरवठ्याबाबत दर १५ दिवसांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेत असून, टँकरची संख्या वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाणीपुरवठा लवकरात लवकर कसा सुरळीत होईल, यासाठी प्रयत्नशील आहे. पाइपलाइनचे कामही पूर्णत्वाकडे आहे.**
**- विठ्ठल इनामदार, प्रांताधिकारी, पेण**


### Tender Notice

Mahatma Phule Arts Science & Commerce College Panvel, District- Raigad invites tenders with materials from reputed contractors for Waterproofing of Terrace of Sports Complex. Details are as follows.

| Work | Area in sqm | Earnest Money Deposit | Tender Cost (Non refundable) |
|---|---|---|---|
| Waterproofing of Terrace of Sports Complex. | 371 | 4500/- | 1000/- |

The tender documents will be available at Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel from 23/4/2022 to 28/4/2022 between 10.00 a.m. to 5.00 p.m. Last date of Tender Submission is 30/4/2022 Date of Tender Opening will be informed to the respective Contractors.

**sd/-**
**Principal,**
**Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel (Raigad)**


# म्हसळ्यात गोधन चोरणारी टोळी सक्रिय

## खामगाव पंचक्रोशीतील अनेक गुरांची चोरी

**म्हसळा : प्रतिनिधी**

तालुक्यातील खामगाव पंचक्रोशीसह अन्य गावांतील शेतकऱ्यांची गुरे चोरीला जात असल्याच्या घटना वाढत आहेत. काही दिवसांपूर्वी कणघर येथील संतोष उर्फ नाना सावंत यांच्या दोन गाई जंगलात चरण्यासाठी गेल्या असता त्या गोठ्यात परत आल्याच नाहीत. पुन्हा दोन दिवसांत खाम गाव, सुतारवाडी, ताम्हाणेशिर्के, कासारमलई या परिसरातील शेतकऱ्यांचे गोधन गायब केल्याच्या घटना घडल्या. शोध घेऊनही चोरीला गेलेल्या गुरांचा तपास लागत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. गोधन चोरीच्या घटनांची गांभीर्याने दखल घेऊन पोलिसांनी चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

म्हसळा तालुक्यातील कणघर येथील संतोष उर्फ नाना सावंत यांच्या दोन गाई जंगलात चरण्यासाठी गेल्या होत्या. त्या गोठ्यात परत आल्याच नाहीत. दोन दिवस वाट बघून व शोध घेऊनही गायींचा तपास लागला नाही. त्यामुळे सावंत यांनी म्हसळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गस्त वाढवून आणि ठिकठिकाणचे तपासणी नाके कार्यान्वित करून गुरे चोरणाऱ्यांच्या मुसक्या आवळाव्या, अशी मागणी नंदू शिर्के, सतीश शिगवण यांनी या वेळी केली.

म्हसळा तालुक्यात गुरे चोरणारी टोळी सक्रिय झाली असून लागोपाठ सुरू असलेल्या पशुधन चोरीमुळे शेतकऱ्यांत घबराट निर्माण झाली आहे. गोधनाची चोरी करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना लवकरात लवकर अटक करून कडक कारवाई करण्याची मागणी म्हसळा तालुक्यातून होत आहे.

**संतोष सावंत (रा. कणघर) यांचा अर्ज मिळाला आहे, मात्र अद्याप गुन्हाची नोंद केली नाही, त्यामुळे तपासही सुरु नाही.**
**-उध्दव सुर्वे, सहाय्यक निरीक्षक, म्हसळा पोलीस ठाणे.**

**मी दिलेल्या अर्जाप्रमाणे पोलिसांनी गोवंश चोरीचा गुन्हा नोंदवावा, ही माझी अपेक्षा होती. गोवंश चोरी, हत्या याबाबत केंद्र व राज्य सरकारचे स्पष्ट आदेश असताना म्हसळा पोलीस चालढकलपणा का करतात, याची वरिष्ठांकडे तक्रार करण्यात येईल.**
**-संतोष उर्फ नाना सावंत, तक्रारदार शेतकरी**

**शेतकऱ्यानी आपल्या गोधनाची नोंद ग्रामपंचायतीत करून, त्यांचा योग्य विमा उतरविणे गरजेचे आहे. गोधनाची चोरी झालेल्या प्रत्येकाने गोधन बेपत्ता झाल्यावर तात्काळ नजिकच्या पोलीस ठाण्यात तक्रार द्यावी.**
**-महादेव पाटील, अध्यक्ष, म्हसळा तालुका हिंदू समाज.**

# पोलादपूर तालुक्यात उष्म्यात प्रचंड वाढ

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्याच्या विविध भागात गुरूवारी सकाळी सव्वा दहा वाजेपर्यंत पावसाने हजेरी लावली. त्यानंतर लख्ख सुर्यप्रकाश पसरल्यामुळे हवेतील उष्म्यात प्रचंड वाढ होऊन अंगातून घामाच्या धारा निघू लागल्याने नागरिक हैराण झाले.

पोलादपूर तालुक्यात गुरूवारी सकाळी साडेनऊ वाजल्यापासून सव्वा दहा वाजेपर्यंत अचानक पाऊसधारा कोसळू लागल्या. त्यानंतर आकाशातील मळभ दूर होऊन लख्ख सुर्यप्रकाश पसरला. त्यामुळे हवेतील गर्मी वाढून तापमान झपाट्याने २९ अंशावरून ४२ अंशापर्यंत पोहोचले. सकाळी पडलेल्या पावसाच्या पाण्याची या उष्णतेने वाफ होऊन हवेतील उष्म्यात प्रचंड वाढ झाली आणि पोलादपूर शहरासह तालुक्यात सर्वत्र उष्णता जाणवू लागली.

रात्री अंगाची काहिली वाढली असताना महावितरणने दोन तास विद्युतपुरवठा खंडित ठेऊन जनतेच्या संतापात भर टाकली. सावित्री नदीदेखील उथळ आणि कोरडी झाल्यामुळे नदीपात्रातील दगड-गोट्यांनी तापमान वाढविण्यास सहकार्य केल्याचे दिसून येत आहे.



(छाया : शैलेश पालकर)


### जाहीर नोटीस

**उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

टेनन्सी अपिल On Admiision

१. श्री. नारायण आनंद शेलार, रा. प्लॉट क्र. १०३, पहिला मजला, पटेल प्लाझा, भिंगार पीटर जे. एस. रोड, दहिसर (पश्चिम) मुंबई ४०००६८
तर्फ कुल अखत्यारी श्री. मनोहर रामचंद्र शेलार,
रा. प्लॉट नं. ६०१, ई विंग, भगवती हॅरीटेज सेक्टर क्र.२१,
कामोठे,नवी मुंबई ४१० २०९. ...... वादी

**विरुध्द**

कै. रामभाऊ धर्मा तांडेल (मयत) तर्फे वारस
१. श्री. तुकाराम रामभाऊ तांडेल,
२. श्री. आत्माराम रामभाऊ तांडेल,
३. श्री. नामीबाई सदाशिव गडकरी, क्र.१ ते ३ रा. चिखले, ता.पनवेल.
४. तारीबाई जोमा फुलोरे, रा. भोकरपाडा, ता.पनवेल.
५. सौ. भारती सुरेश बडे,
६. सीताबाई रामभाऊ तांडेल,
७. शांताबाई विठ्ठल तांडेल,
८. श्री. दत्ता विठ्ठल तांडेल,
९. श्री. मनोज विठ्ठल तांडेल,
१०. सुगंधा रमेश खैरे,
११. सुनंदा विठ्ठल तांडेल,
१२. महानंदा विठ्ठल तांडेल,
१३. स्वप्नाली केशव तांडेल. रा. ओवळे, ता. पनवेल.
१४. श्री. गणपत धोंडू पाटील,
१५. श्री. कृष्णा धोंडू पाटील
१६. श्री. तुकाराम धोंडू पाटील,
१७. मथीबाई पूद गायकर,
क्र.१४ ते १७ रा. चिखले, ता.पनवेल.
१८. श्री. जनार्दन चांगा पाटील,
१९. भागी धर्मा म्हात्रे,
क्र.१८ व १९ रा. विंचुबे, ता.पनवेल.
२०. अनुसया बाबू चौधरी, २१. बेबी पांडुरंग ढवळे,
क्र.२० व २१ रा. शिवकर, पो. चिखले, ता. पनवेल.
२२. मेसर्स दीप ज्योत एंटरपायजेस तर्फे भागीदार
अ. श्री. लखमन गोवाभाई भाटेसरा, ब. श्री. मनजी रणछोड दुबरीया,
क. श्री. हिरजी लालजी दुबरीया, ड. श्री. नारायण धनजी दुबरीया,
इ. श्री. अंबालाल भगवानजी रावरीया,
पत्ता- शॉप नं.४, मिलेनियम बिझनेस पार्क, सेक्टर क्र.२,
महापे, (एम.आय.डी.सी) नवी मुंबई ४०० ७१०. .......... प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, मौजे-बेलवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील स.नं.३५/० बाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८चे कलम ७४ नुसार अप्पर तहसिलदार पनवेल शेतजमिन न्यायाधिकरण पनवेल यांचे कडील ३२ग दावा क्र.टेनन्सी/एसआर/२६-२०१७ दिनांक २२/१२/२०१७ रोजी झालेल्या आदेशाविरुध्द अपिल या कार्यालयात दाखल केले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत. प्रस्तत अपिलाच्या सनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दिनांक २८ एप्रिल २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उप विभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

मौजे- बेलवली, ता. पनवेल, जि. रायगड

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉं | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ३५ | ० | ०.१५.७ | ३.१९ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.
ठिकाण :- पनवेल.
दिनांक :-२८/०३/२०२२

शिक्का

**सही/-**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**


# खोपोलीतील लवजी शाळेत शाळापूर्व तयारी मेळावा

**खोपोली : प्रतिनिधी**

मराठी शाळेकडे बघण्याचा पालकांचा दृष्टिकोन बदलावा व मराठी शाळेत जास्तीत जास्त विद्यार्थी यावेत, याकरिता शिक्षण मंडळातर्फे सध्या विविध शाळांमध्ये शाळा पूर्व तयारी मेळावा कार्यक्रम घेण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर खोपोली नगरपालिका हद्दीतील लवजी शाळा क्र. आठ येथे नुकताच शाळा पूर्व तयारी मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

प्रारंभी दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन झाल्यानंतर मुख्याधिकारी तृप्ती खालापूरकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. ज्येष्ठ शिक्षिका ज्योती आढळ यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या सात स्टॉल्सची माहिती उपस्थित शिक्षिकांनी मान्यवरांना तसेच विद्यार्थ्यांना दिली.

माजी नगरसेवक सदाशिव पाटील, ज्येष्ठ ग्रामस्थ अर्जुन पाटील, गुलाबताई पाटील, किशोर पाटील, साधना कुलकर्णी, माध्यमिक विद्यालयाचे पर्यवेक्षक देशमुख यांच्यासह लवजी ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमापूर्वी विद्यार्थिनींच्या लेझीम प्रात्यक्षिकांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

शिक्षण विभागाचे केंद्र समन्वयक लियाकत पठाण यांनी या शाळा पूर्व तयारी मेळाव्याला भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले. या शाळेचे माजी विद्यार्थी अतुल आढळ यांनी शाळेला पाच हजार रुपयांची देणगी दिली. या मेळाव्यामुळे शाळेत उत्साहाचे वातावरण तयार होईल, असे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.



(छाया : विनायक माडपे)

# दीक्षांत सोहळ्याने पेणकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले

## दीक्षांती मुमुक्ष प्रणाली जैन आता गुणसिद्धीवर्धनाश्रीजी महाराज



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील कापड व्यापारी रवींद्र जैन यांची मुलगी मुमुक्षू प्रणाली जैन (वय २८) हिचा दीक्षा महोत्सव कार्यक्रम गुरुवारी (दि. २१) पेणमध्ये आचार्य भगवान श्री देवकीर्ती सुरीश्वर महाराज तसेच साध्वी परमवर्धना श्री.जी. महाराज यांच्या उपस्थितीत झाला. पेणकारांसोबतच आलेल्या हजारो जैन बांधवांनी हा सोहोळा याची देही यांची डोळा अनुभवला.

गुरुवारी सकाळी पं. पु. आचार्य भगवान श्री देवकीर्ती सुरीश्वर महाराज यांनी विधिवत पूजा करीत सोहोळ्यास प्रारंभ केला. शेवटी पं.पु. आचार्य भगवान श्री देवकीर्ती सुरीश्वर महाराज यांनी दीक्षांती प्रणाली जैन हिचे नाव गुण सिद्धीवर्धनाश्रीजी महाराज म्हणून घोषित केले. पेण तालुका क्रीडा संकुल येथे आयोजित केलेल्या या सोहोळ्यास आमदार रविशेठ पाटील, आमदार अनिकेत तटकरे, नगराध्यक्षा प्रीतम पाटील, उपनगराध्यक्षा वैशाली कडू, माजी जि.प.सदस्य कौसल्याताई पाटील, नगरसेवक दर्शन बाफणा, अजय क्षीरसागर, देवता साकोस्कर, संतोष श्रृंगारपुरे, नगरसेविका वसुधा पाटील, ममता पाटील, नरेंद्र पाटील, ललित पाटील, विशाल बाफणा, सागर हजारे, उद्योजक राजू पिचिका आदींसह जैन बांधव व इतर समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीक्षा महोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पेण तालुका जैन संघाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दशपर्णी अर्क ठरतोय शेतकऱ्यांच्या फायद्याचा!

## सेंद्रिय खताला मागणी

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील बार्डी गावातील हेमंत कोंडीलकर यांनी सेंद्रिय खतांची निर्मिती केली आहे. भाजीपाला शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना हे खत मदतगार ठरत आहे. दरम्यान, दशपर्णी अर्क सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी फायद्याचा ठरत असून सेंद्रिय खते वापरून केलेल्या शेतीला बाजारात चांगली मागणीदेखील आहे.

उत्तम आरोग्यासाठी सेंद्रिय खतांच्यापासून केल्या जाणाऱ्या शेतीला महत्त्व आले आहे, हे लक्षात घेऊन कर्जत तालुक्यातील बार्डी येथील शेतकरी हेमंत कोंडीलकर यांनी दशपर्णी अर्क शोधून काढला आहे. या दशपर्णी अर्काचा प्रसार त्यांनी शेतकऱ्यांच्या घरी जाऊन केला. भाजीपाला शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना ते दशपर्णी अर्काची माहिती द्यायचे. दशपर्णी अर्क यशस्वी ठरत असून कर्जत, खालापूर आणि अंबरनाथ तालुक्यातील १०० हुन अधिक भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांनी दशपर्णी अर्काचा वापर करून शेती केली आहे.

हेमंत कोंडीलकर यांनी तयार केलेल्या दशपर्णी अर्काचा वापर करून गुडवन (ता. कर्जत) येथील शेतकरी नरेश धोंडू खडे यांनी आपल्या शेतात मेथी, कोथिंबीर, चवळी, भेंडी, मका, टोमॅटो यांचे उत्पादन घेतले आहे. रासायनिक खतांना पर्याय म्हणून कोंबडी खत, दशपर्णी अर्क यांचा वापर करून नरेश खडे यांनी भाजीपाला पिकवून शेतकऱ्यांसमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

**आम्ही सेंद्रिय खतांचा (दशपर्णी) अर्क बनविला आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्याने आता सेंद्रिय खतांच्या वापर करून पिकवलेली भाजी चाखायला मिळू शकते, त्याचा आस्वाद घ्या.**
**-हेमंत कोंडीलकर, शेतकरी, बार्डी, ता. कर्जत**





(छाया : संतोष पेरणे)


### URGENTLY REQUIRED

**Following Candidates for sites across Maharashtra.**

- **Fitter** - ITI Diploma - Minimum 3 to 5 Years Exp.
- **Electrician** - ITI Diploma -Minimum 3 to 5 Years Exp.
- **Welder** - ITI Diploma -Minimum 3 to 5 Years Exp.
- **Fitter** - ITI Diploma -Minimum 3 to 5 Years Exp.
- **Senior Welder** - ITI Diploma -Minimum 10 Years Exp.
- **Senior Fitter** - ITI Diploma -Minimum 10 Years Exp.
- **Senior Electrician** - (PLC Operation) - ITI Diploma-Minimum 10 Years Exp.
- **LMV Driver** - Minimum 1 year Exp.(with proper license)
- **Computer Operator** - Minimum 2 Years Exp. (with Graduation)

*Interested Candidates may email/submit their resume at the address given below :*

**M/s. Thakur Infraprojects Pvt. Ltd.**
1st floor, Om Sadnika Bldg., Plot No.265/1,
Uran Naka, Panvel - 410 206, Navi Mumbai. State Maharashtra, Ph. 022-27452713, 9769409120
email - thakurinfraprojects@gmail.com
websit : www.thakurinfraprojects.in

# नवी मुंबईत ६८ ठिकाणी ‘माणुसकीची भिंत’

## स्वच्छ भारत अभियानांतर्गत उपक्रम; संकल्पनेला प्रतिसाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत नवी मुंबई पालिकेने हवे असेल ते घ्या आणि नको असेल ते द्या अशी संकल्पना राबविण्यात आली असून शहरातील महत्त्वाच्या ६८ ठिकाणी माणुसकीची भिंत उभारण्यात आली आहे. या ठिकाणी आपल्याकडील जुने मात्र चांगल्या स्थितीतील कपडे, चप्पल, बूट, भांडी, खेळणी, अंथरुण-पांघरुण आणि पुस्तके ठेवण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. या जीवनावश्यक वस्तूंवर नजर ठेवण्यासाठी त्या परिसरातील स्वच्छता पर्यवेक्षक, स्वच्छता कर्मचारी नेमण्यात आले आहेत. पालिकेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक केले जात असून नागरिकांची आहे.




### हवे ते घेऊन जा... नको ते ठेवून जा!

*तुम्हाला हवे असलेले घेऊन जा आणि नको असलेले या माणुसकीच्या कपाटात ठेवून जा, असा संदेश या माध्यमातून दिला जात आहे. या महागाईच्या काळात गरीब-गरजू लोकांना मदत करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.*

नवी मुंबई पालिकेने कपडे, चप्पल, बूट, खेळणी, अंथरुण-पांघरुण पुस्तके आणि इतर वापरातील नाशिवंत नसलेल्या जीवनावश्यक वस्तू ठेवण्यासाठी १५ ते २० खणांचे एक लोखंडी कपाट ठेवण्यात आले आहे. यातील प्रत्येक खणावर वस्तूचे नाव लिहिलेला फलक लावला आहे. बेलापूर येथील कॉम्रेड भाई पाटील चौकाजवळ तसेच आर्टिस्ट व्हिलेजमध्ये अशा प्रकारचे माणुसकीच्या खणांचे कपाट ठेवले असून नागरिकांचा त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या कपाटांची मागणी वाढत असल्याचे घनकचरा विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब रांजळे यांनी सांगितले. पालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या संकल्पनेतून उभ्या राहणाऱ्या या माणुसकीच्या कपाटांचे प्रमाण वाढविण्यात येणार आहे.



**पनवेल : रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथील आय थिंक स्पोर्ट क्लबचा धैय किशोर पाटील याची मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या १४ वर्षांखालील लेदर बॉल निवड चाचणी स्पर्धेत निवड झाल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर ठाकूर यांनी त्याला शुभेच्छा दिल्या. या वेळी सुधीर ठाकूर, किशोर पाटील, गजानन ठाकूर आदी उपस्थित होते.**

## अमोल मिटकरींविरोधात नवी मुंबई ब्राह्मण समाज आक्रमक

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी जाहीर सभेत ब्राह्मणांबद्दल केलेल्या वक्तव्याविरोधात नवी मुंबईतील ब्राह्मण समाज व परशुराम सेवा संघ आक्रमक झाला असून वाशी पोलीस ठाण्यासमोर घोषणाबाजी करण्यात आली आणि निवेदन देण्यात आले.

अमोल मिटकरी जे बोलले तसे कोणतेही शब्द लिहिलेले नाहीत आणि असे चुकीचे शब्द आमदार असलेल्या व्यक्तीने बोलणे हे असभ्यपणाचे लक्षण आहे. याबद्दलही नवी मुंबईतील ब्राह्मण समाज व परशुराम सेवा संघाने नाराजी व्यक्त केली. जर अमोल मिटकरींवर कारवाई झाली नाही तर आम्ही उपोषण करणार असल्याचे सांगण्यात आले.



## कळंबोली येथून तरुणी बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

एक १९ वर्षे मुलगी ही तिच्या लहान बहिणीस शाळेतून घेऊन येते असे सांगून गेली ती अद्याप परतलेली नाही. याबाबतची तक्रार तिच्या कुटूंबीयांनी कळंबोली पोलीस ठाण्यात दिली आहे. प्रतिभा राजेश कुशवाह (वय १९, रा. सेक्टर-१, कळंबोली) असे या मुलीचे नाव असून रंग सावळा, केस लांब कंबरेपर्यंत, गुलाबी कुर्ता, निळी जिन्स पॅन्ट व काळी ओढणी, नाकात नथणी घातलेली आहे. डाव्या हाताच्या मनगटावर जुना कापल्याचा व्रण आहे. तिला मराठी, हिंदी बोलता येते. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा पो. ना. किशोर म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नवीन पनवेलमध्ये दुचाकीची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल उड्डाणपुलाजवळ उभी करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. आकुर्ली येथे राहणाऱ्या ए. ए. राठोड यांनी त्यांची दुचाकी नवीन पनवेल पुलाजवळ उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## महावितरणच्या सब स्टेशनबाहेर आग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील कोपरा गाव सेक्टर १० याठिकाणी असलेल्या महावितरणच्या सब स्टेशनबाहेरील विद्युत वाहिनीला आग लागून भडका उडाल्याची घटना गुरुवारी (दि. २१) रात्री ११.४५ च्या सुमारास घडली. या घटनेमुळे कोपरा गाव सेक्टर १० मधील वीजपुरवठा काही काळ खंडित करण्यात आला होता.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नगरसेवक व स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर यांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाने त्वरित घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले. यानंतर अवघ्या १० मिनिटांतच या परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याची शक्यता वर्तविण्यात आली.

## पनवेलमध्ये सामाजिक सुविधा मार्गदर्शन केंद्र

### नगरसेविका दर्शना भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्हा नियोजन समिती सदस्या तथा कार्यतत्पर नगरसेविका दर्शना भोईर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शुक्रवारी (दि. २२) सामाजिक सुविधा मार्गदर्शन केंद्र, योजना आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात आला.

शासकीय योजनेचा जास्तीत जास्त लोकांना लाभ मिळवा यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‍घाटन महापालिकेच्या उपमहापौर सिताताई पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये काही निवडक योजनांची माहिती नागरिकांना देऊन त्याचा लाभ घेण्यासाठी नोंदणी कार्यक्रमही घेण्यात आला.

या वेळी नगरसेवक नितीन पाटील, ओबीसी सेल जिल्हाअध्यक्ष राजेश गायकर, माजी नगरसेविका निता माळी, ज्येष्ठ कार्यकर्त्या सुहासिनी केकाणे, अंजली इनामदार, ओबीसी मोर्चा पनवेल शहर सरचिटणीस प्रसाद म्हात्रे, सूर्यकांत पंडित, सपना पाटील, श्वेता म्हात्रे, स्नेहा पंडित, निता मंजुळे, सनी बागडी, कविता पाटील, कल्पिता खेडेकर, सुहासिनी केकाणे, अंजली इनामदार, चेतन वाघ, विकी कागडा, ऋषिकेश घेरडे, प्रीती आरे, मनीषा वाघ, मेनिया रिडो यांच्यासह नागरिक उपस्थित होते.





## उलवे येथे वटवृक्ष संस्थेतर्फे जागतिक वसुंधरा दिनानिमित्त वृक्षारोपण

**उरण : बातमीदार**

अमेरिकेतील सॅन फ्रॅन्सिस्को गेलार्ड नेल्सन यांनी १९७० मध्ये अर्थ डे ही सर्वप्रथम संकल्पना मांडली. त्यानुसार २२ एप्रिल हा दिन जागतिक वसुंधरा दिन म्हणून जगभर साजरा होत असतो.

उलवे येथील वटवृक्ष सामाजिक संस्थेच्या वतीने स्थानिक परिसंस्थेला उपयुक्त असणाऱ्या देशी वृक्ष लागवड करून जागतिक वसुंधरा दिन साजरा करण्यात आला.

वसुंधरेच्या संरक्षणासाठी कटीबद्ध राहण्याची हिच खरी वेळ आणि अंतिम संधी आहे. त्यामुळे सर्वांनी वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगचा विचार करून आपल्या भावी पिढीसाठी किमान एक व्यक्ती एक झाड लावूया, वसुंधरेला हरित करण्याचा संकल्प करावे, असे मत या वेळी संस्थेचे अध्यक्ष किरण मढवी यांनी व्यक्त केले.




संस्थेचे कार्यकर्ते वृक्षमित्र सचिन पाटील यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून राष्ट्रीय वृक्ष वड आणि राज्यवृक्ष असणाऱ्या आंब्याचे रोपण केले. त्याबद्दल संस्थेमार्फत त्यांना निसर्गमित्र सन्मानपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

या वेळी वटवृक्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण मढवी, पोलीस अधिकारी सचिन बोठे, मनोहर चवरकर, वसंता राजगोपालन, जयप्रकाश मंडल, गणेश मढवी, सचिन पाटील, अमोल कदम, हितेश शिंगरे, वेदांत पाठक, शांताराम ठाकूर आदींसह वृक्षमित्र, पर्यावरण प्रेमी उपस्थित होते.



**पनवेल : खैरवाडी कोंडले येथील इमॅन्यूअल मर्सी होम आश्रमचे फादर सिनू मैथ्यू यांच्या वाढदिवसानिमित्त आदिवासी बांधवांना धान्यवाटप करण्यात आले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, अलिका सिनू मैथ्यू, शंभू मैथ्यू, टिंटू मैथ्यू तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.**



## मनमौजी माउंटेनियर्सने पाच दिवसांत सर केले पाच सुळके

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक, रसायनी, पनवेल विभागातील मनमौजी माउंटेनियर्सने पाच दिवसांत पाच सुळके सर करून अनोखा विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यामुळे इतर माउंटेनियर्समध्ये उत्साह वाढला आहे. इर्शाळगड, तेलबैला डावा, तेलबैला उजवा, कलकराई, वजीर सुळका हे पाच कठीण सुळके रसायनीतील विनयप्रताप हनुमंत सिंग यांच्या नेतृत्वाखाली पाच दिवसांत चढून ही मोहीम पार पाडण्यात आली.

यात १० ट्रेकर्सचा समावेश होता. त्यात विनयप्रताप सिंह, सुजित भगत, हर्षित भावसिर, चेतन फुलमाळी, अक्षय माळी, योगेश थोरात, केतन धोत्रे, अमन मिश्रा, फोटोग्राफर आकाश सहानी आणि गाडी चालक रोहित पाटील या मोहिमेत सामील होते. खालापूर तालुका व पनवेल तालुका यांच्या हद्दीवरील इर्शाळगडचा सुळका पहिल्या दिवशी सर केला. पुणे जिल्ह्यातील लोणावळा येथील तैलबैला किल्ल्याचा डावा इनरवॉल सर केला करून तिसऱ्या दिवशी तैलबैलाचा उजवा इनरवॉल सर केला. चौथ्या दिवशी कर्जत तालुक्यातील ढाकबहिरी येथील कलकराईचा सुळका सर करून रात्रीचा प्रवास करून ठाणे जिल्ह्यातील शहापुर येथील वाशिंदमधील माहुली किल्ल्यावरील सर्वात घातक मानला जाणारा वजीर सुळका सर करून महाराष्ट्रात एक नवा विक्रम प्रस्थापित केला. त्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.





## एनएमटीच्या बस क्र. ७१ अनियमित; प्रवासी नाराज

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमांतर्गत बेलापूर ते कल्याण (तळोजा एमआयडीसी संकुलमार्गे) धावणाऱ्या बस क्रमांक ७१च्या अनियमित सेवेमुळे सध्या प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

दररोज ये-जा करणाऱ्या अनेक प्रवाशांचे म्हणणे आहे की, ही बससाठी तासन्‌तास ताटकळत बसावे लागते. बसची येण्याची निश्चित वेळ नसते. सकाळी पहिल्या बस मार्गावरून सुटल्यानंतर वेळापत्रकानुसार एकही बस धावत नाही. बेलापूर आगारात लांबच लांब रांगेत उभे राहिल्यानंतर अचानक बस रद्द झाल्याचे समजते. बेलापूर आगारात एनएमएमटीच्या नियंत्रकांना विचारले असता, ते उडवाउडवीची उत्तरे देतात असे प्रवाशांचे म्हणणे आहे. दुसरी बस किती वेळात सुटणार हे प्रवाशांना सांगू शकत नाही. बस रद्द करण्यामागचे कारण विचारले असता, बसमध्ये बिघाड झाला आहे किंवा बस वाहतूक कोंडीत अडकली आहे, असे नेहमीचे ठरलेले उत्तर नियंत्रकांकडून दिले जाते.

या बसच्या अनियमिततेमुळे त्रस्त झालेल्या अनेक प्रवाशांनी एनएमएमटीच्या व्यवस्थापन विभागाकडे अनेकदा तक्रार करूनही दुर्लक्ष सुरूच आहे. प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने या रस्त्यावर एनएमएमटीने दुसरी बस सुरू करावी, अशी मागणी प्रवाशांमधून करण्यात येत आहे.



**या महिन्याच्या आकडेवारीनुसार बसेसच्या वेळापत्रकात फक्त तीन दिवस उशीर झाला आहे. असे असले तरी नवीन डिजिटल प्रणालीद्वारे चालविण्यात येणाऱ्या या परिवहन सेवेत इतरही अनेक सुधारणा करण्यात येत असून त्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.**
**-योगेश कडूसकर, व्यवस्थापक, एनएमएमटी**

## नगरसेवक प्रकाश बिनेदार यांच्या नेतृत्वाखाली भीमोत्सव उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत देशाला अधिक बलवान बनवायचे असेल तर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढे नेणे गरजेचे आहे. त्यासाठी आंबेडकरी चळवळ धारदार बनवून देशात समता, बंधुत्व, न्याय व विज्ञानाचा पुरस्कार करणे हे प्रत्येक आंबेडकरी अनुयायाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन प्रवचनकार कल्पेश कांबळे यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समिती व भाजप अनुसूचित जाती मोर्चा यांच्या विद्यमाने १४ ते १६ एप्रिलदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३१वी जयंती नवीन पनवेल येथे उत्साहाने साजरी करण्यात आली त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी होते. या वेळी अपेक्षा बिनेदार, प्रमिला वानखेडे आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले. भीमजयंती महोत्सवाचे आयोजक नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनीही मार्गदर्शन केले.



तीन दिवस चाललेल्या या भीमजयंती महोत्सवात गायक एकनाथ माळी व गायिका रेश्मा सोनावणे यांचा भीमगीतांचा बहारदार सामना ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संदेश जाधव होते. दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राचे प्रख्यात गायक आनंद शिंदे यांचाही भीमगीतांचा बहारदार कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा स्वाती बिनेदार होत्या.

तिसऱ्या दिवशी ज्येष्ठ नागरिक माता-पितांचा हृद्य सत्कार करण्यात आला तसेच गायक प्रकाश सावंत यांचा वाद्यवृंदनाचाही कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

या भीमजयंती महोत्सवास आमदार प्रशांत ठाकूर, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष सुधाकर भालेराव, महापौर कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, शहराध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक नितीन पाटील, नगरसेविका वृषाली वाघमारे, नगरसेविका राजश्री वावेकर, नगरसेविका सुशिला घरत यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.

# रोहा तालुक्यातील २६ गाव पाणीपुरवठा योजनेचे तीनतेरा

- लाभार्थी १३ गावांना टँकरने पाणीपुरवठा
- १५ टँकरद्वारे भागवली जातेय तहान
- शासनदरबारी मात्र तालुका पाणीटंचाईमुक्त

**रोहे : महादेव सरसंबे**

तालुक्यातील कुंडलिका नदीतीरावरील २६ गावांसाठी एमआयडीसीकडून २६ गाव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली. मात्र या योजनेतील १३ गावांना सध्या पाणी मिळत नसल्याने तेथे एमआयडीसीकडून टँकरने पाणीपुरवठा केले जात आहे, मात्र पंचायत समितीकडे पिण्याच्या पाण्यासाठी मागणी नसल्याने रोहा हा पाणीटंचाई मुक्त तालुका असल्याचा विरोधाभास पहावयास मिळत आहे.

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यामुळे रोहा तालुक्यातील बारमाही वाहणारी कुंडलिका नदी दुषीत झाली. नैसर्गिक पाण्याचा स्त्रोत दुषित झाल्याने एमआयडीसीने या गांवाना पाणीपुरवठा करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. त्यानुसार एमआयडीसीच्या माध्यमातून एमजीपीच्या सहकार्याने २६ गाव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली. या योजनेतून पडम, खारापटी, निडी, भातसई, झोळांबे, लक्ष्मीनगर, शेणवई, डोंगरी, शेणवई आदिवासीवाडी, वावेखार, वावेपोटगे, यशवंतखार, सानेगाव, दापोली, कोपरी, धोंडखार आदी २६ गावांना सुरळीत पाणी पुरवठा व्होवु लागला. काही कालावधीनंतर व आता या गावांना पिण्याचे पाणी मिळत नाही. त्यामुळे या गावांना पाणीटंचाई निमर्ण झाली. या योजनेसंदर्भात तहसील, प्रांत, जिल्हाधिकारी कार्यालयात अनेक बैठका झाल्या आहेत. परंतु कोणतेही सकारात्मक फलित पुढे आले नाही. आज भातसई, झोळांबे, लक्ष्मीनगर, शेणवई आदिवासीवाडी, शेणवई, डोंगरी, वावेखार, वावेपोटगे, सानेगाव, दापोली, कोपरी, करंजवीरा आदी १३ गावांना १५ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.

उन्हाळा वाढला आहे. त्यामुळे रोहा तालुक्यात प्रचंड उकाडा जाणवत आहे. सर्वत्र उत्सव, सण, यात्रा, जत्रा चालू आहेत. अशा वेळी या गावांना पाणीपुरवठा करणारी योजना कार्यान्वित नसल्याने ग्रामस्थांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आपण पाणी आणले आहे, आम्ही योजना मंजूर केली, आम्ही या भागाला पाणीपुरवठा करू अशा पध्दतीने सातत्याने ग्रामस्थांना सांगत आहेत. परंतु प्रत्यक्षात या गावांना टँकरने पाणीपुरवठा होत आहे, हे कोणी नाकारू शकत नाही. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. दुसरीकडे रोहा पंचायत समितीकडून तालुका पाणीटंचाई मुक्त आहे, असे सांगण्यात येत आहे.



## कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाणारा टेम्पो पकडला

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील इंदापूर येथे गुरुवारी (दि. २१) मध्यरात्री कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाणारा आयशर टेम्पो माणगाव पोलिसांनी पकडून एकूण नऊ लाख ९० हजार रुपयांचा माल जप्त केला. याप्रकरणी चार आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी अब्दुल्ला नसुरुल्ला मुजावर (वय ४४, रा. मानखुर्द, मुंबई), समीर निजाम कुरेशी (वय १९, रा. गोवंडी मुंबई), संतोष सावकार पवार (वय ४२, रा. इंदापूर, ता. माणगाव) आणि रईस मुन्ना कुरेशी (वय ५२, रा. इंदापूर, ता. माणगाव) हे एका आयशर टेम्पो (एमएच–०१,सीआर–८२९०) मधून १६ म्हैस जातीची जनावरे मुंबई येथे कत्तल करण्यासाठी नेत असताना इंदापूर येथे गुरुवारी मध्यरात्री मिळून आले. टेम्पोसह एकूण नऊ लाख ९० हजार रुपयांचा माल माणगाव पोलिसांनी जप्त केला असून, चारजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात भादवि संहिता कलाम ३७९,३४ महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम १९९५ कलम ५ अ,५ ब प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास उपनिरीक्षक श्री. आघाव करीत आहेत.


**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. पमपा/सचिवा२१–२२/प्र.क्र २७/ /२२ दिनांक :– २२/०४/२०२२

**पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा**

**सूचना क्रमांक ४७. दिनांक ०५/०५/२०२२**

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक ०५/०५/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता पनवेल महापालिकेचे नाट्यगृह, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, पनवेल या ठिकाणी खालील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी सदर बैठकीस उपस्थित राहावे.

**सभा सूचना क्र. ४७ दिनांक ०५/०५/२०२२ रोजीची**

**विषय पत्रिका**

**मा.स्थायी समितीकडील कामकाज**

स्थायी समिती सभा ठराव क्र. ५४५ दिनांक १८/०४/२०२२ रोजी मंजूर झालेला पनवेल महानगरपालिकेचा आर्थिक वर्ष सन २०२१–२२ चे सुधारित व सन २०२२ – २३ चे मुळ वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत निर्णय घेणे.

(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :–२२/०४/२०२२

**सही/–**
**(तिलकराज खापर्डे)**
**नगर सचिव (प्र.),**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**


## पेण एसटी आगारात १०० टक्के उपस्थिती

### ग्रामीण भागातही सेवा होणार सुरू

**पेण : प्रतिनिधी**

न्यायालय आणि राज्य सरकारने कर्मचाऱ्यांना कामावर हजर होण्याचे निर्देश दिल्यानंतर एसटीच्या रायगड विभागातील आठ आगारांमधील जवळपास सर्व गाड्या सुरू करण्यात आल्या आहेत. येत्या काही दिवसांत ग्रामीण भागातील एसटी सेवा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती रायगड विभागीय नियंत्रक अनघा बारटक्के यांनी दिली.

विविध मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी आंदोलन पुकारल्याने पाच महिन्यांपासून ठप्प असणारी एसटी सेवा पुन्हा पूर्वपदावर येत आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर रायगड विभागातील पेण, अलिबाग, रोहा माणगाव, श्रीवर्धन, महाड, मुरुड, कर्जत या आठ आगारांतील अनेक कर्मचारी कामावर हजर झाले असून पेणमध्ये १०० टक्के कर्मचारी रुजू झाले आहेत. रायगड विभागात सुमारे ९० टक्क्यांच्यावर एसटी सेवा सुरू झाली असून दरदिवशी उत्पन्नात वाढ होत आहे.



**पेण आगाराच्या गाड्या जास्त प्रमाणात सुरू झाल्या असून, लवकरच ग्रामीण भागातही सदर एसटी सेवा सुरू करण्यात येणार आहेत. लांब पल्ल्याच्या गाड्या धावू लागल्यामुळे उत्पन्नात वाढ झाली आहे. निलंबित कर्मचाऱ्यांना सेवेत पुन्हा संधी देण्याची कार्यवाही सुरू आहे.**

**–अनघा बारटक्के,**
**विभाग नियंत्रक, पेण**

## बेणसे ग्रामपंचायतीतर्फे विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**पाली : प्रतिनिधी**

बेणसे ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील प्राथमिक शाळेमधील पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी उपलब्ध शैक्षणिक साधने व सुविधांचा पुरेपूर लाभ घेऊन शिक्षण घ्यावे, गाव व जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन सरपंच मधुकर पारधी यांनी या वेळी केले. सामाजिक कार्यकर्ते उद्धव कुथे यांनीही मनोगत व्यक्त केले.

बेणसे ग्रामपंचायत सदस्य उद्धव कुथे, सदस्या प्रिती कुथे, प्रगती गोरे, सुलताना मांढरे यांच्यासह शिक्षक, शिक्षिका. ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.



(छाया : धम्मशील सावंत)


**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. पमपा/सचिव/२१–२२/प्र.क्र २६/ /२२ दिनांक :– २२/०४/२०२२

**पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा**

**सूचना क्रमांक १५, दिनांक २७/०४/२०२२**

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक २७/०४/२०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता पनवेल महापालिकेचे नाट्यगृह, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, पनवेल या ठिकाणी खालील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी सदर बैठकीस उपस्थित राहावे.

**बुधवार, दिनांक २७/०४/२०२२ रोजी विशेष सर्वसाधारण सभेची**

**विषय पत्रिका**

**मा. आयक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज**

१. **सर्वसाधारण सभा ठराव क्र.४४८, दिनांक १९/०४/२०२२ रोजीचा स्थगित विषय–**
पूर्वाश्रमीच्या पनवेल नगर परिषदेमार्फत ६ वाणिज्य संकुलातील ३० वर्षांच्या कालावधीकरिता लिज भाडेतत्वावर देणेत आलेले गाळे लिज करारनामा करणेकामी तसेच हस्तांतरीत करणेकामी मान्यता मिळणेबाबत.

२. पनवेल महानगरपालिका मालकीचे पनवेल शहरातील अंतिम मूखंड २७३ (पार्ट) ठिकाणी डेंस फॉरेसट तयार करणेबाबत रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलला अनुमतीने देणेबाबत.

(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :–२२/०४/२०२२

**सही/–**
**(तिलकराज खापर्डे)**
**नगर सचिव (प्र.),**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**


## मुरूडमध्ये उभारली प्रवासी बसथांबा शेड

**मुरुड : प्रतिनिधी**

नागरिकांच्या मागणीवरून मुरूड नगर परिषदेने शहरातील गणेश आळी येथील मुख्य नाक्यावर मुंबईच्या धर्तीवर बस निवारा शेड उभारली आहे. या निवारा शेडचा विशेषत: विद्यार्थ्यांना चांगला फायदा होणार आहे

मुरूड शहरातील गणेश आळी येथील नाक्यावर प्रवाशांसाठी लवकरात लवकर निवारा शेड उभारण्यात यावी, अशी मागणी त्या परिसरातील नागरिक करीत होते. माजी नगरसेविका युगा ठाकूर यांनीही या मागणीचा पाठपुरावा केला. त्याची दखल घेत नगर परिषदेचे मुख्याधिकारी भुसे यांनी गणेश आळी नाक्यावर कमीतकमी जागेमध्ये अत्यंत देखणी प्रवासी शेड उभारली आहे. त्यामुळे या परिसरातील प्रवाशांसह अंजुमन हायस्कूल आणि सर एस. जे. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची चांगली सोय झाली आहे. या निवारा शेडचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी भुसे यांनी केले आहे.



## देगाव येथे शाळापूर्व तयारी मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील देगाव शाळेत बुधवारी (दि. २०) शाळापूर्व तयारी मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या वेळी उत्साहपूर्ण वातावरणात ढोल–ताशाच्या गजरात, लेझीमच्या तालावर ठेका धरत विद्यार्थ्यांनी नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत केले.

देगाव शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय गायकवाड यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन झाले. दिपप्रज्वलन आणि स्वागत समरंभानंतर नोंदणी कक्ष, शारीरिक विकास कक्ष, बौद्धिक विकास कक्ष, सामाजिक व भावनिक विकास कक्ष, गणन पूर्वतयारी कक्ष, भाषा विकास कक्ष, मार्गदर्शन कक्ष आशा विविध कक्षांद्वारे प्रात्यक्षिक करून नवागत विद्यार्थ्यांचे विकासपत्र भरून घेण्यात आले.

शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या शेजल कदम, महादेव मर्चंडे, समिक्षा दिवेकर, शाळेचे मुख्याध्यापक महेश विचारे, पदवीधर शिक्षक शंकर शिंदे, विषय शिक्षक अजित लाड, अंगणवाडी सेविका तेजश्री गायकवाड, मदतनीस विद्या गायकवाड, माजी विद्यार्थी ऋतिक गायकवाड, अमृता शेलार यांनी हा शाळा पूर्व तयारी मेळावा यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.




(छाया : सलीम शेख)


**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर नोटीस**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार, किंवा कंपनी यांचेकडून ई–निविदा पद्धतीने निविदा मागवीत आहेत. खालील कामाचे कोरी निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २५/०४/२०२२ ते दि.०९/०५/२०२२ पर्यंत सायंकाळी १५.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर ई निविदा ऑनलाईन कार्यप्रणाली व्दारे स्वीकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | कामाची मुदत | बयाणा रक्कम | कोरी ई–निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | मुदत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभुमीमध्ये अंत्यविधी सेवा पुरविणेबाबत. | ०३ + ०२ वर्ष | रु. १,९५,०००/– | रु. १५,७५०/– (जी.एस.टी. सह) |

जा.क्र.पमपा./घकवि/२५२२/प्र.क्र.–७३/३१६/२०२२, दि.२२/०४/२०२२

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**



**SRM E–TENDER NOTICE (SECOND CALL)**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.: EE/EHV (O&M) /DIVN/MHD/Tech/Tender-10/2022-23 Dtd.24.03.2022 RFX No. 7000022738** | **Sub:-** Second Call for SRM E-Tender for the work of height rising of C&R and PLCC Panel at 220 kV Mahad S/s under EHV (O&M) Dn. Mahad. | **Rs. up to 22,87,480/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs. 5000/- whichever is the highest & tender fee will be the Rs. 500/-plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from **23.04.2022 @ 00:00 hrs to 01.05.2022 @ 23:59 Hrs** for above tender
for further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer**
**EHV(O&M) DN, MAHAD**


## महाडमधील आदिवासींना वन हक्क नोंदणी प्रमाणपत्र वाटप

**महाड : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि जागतिक वसुंधरा दिनानिमित्त शुक्रवारी (दि. २२) महाडमधील आदिवासी बांधवांना वनहक्क नोंदणी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

पारंपारिक वननिवासी अधिनियम २००६ अंतर्गत अनुसूचित जमाती मधील आदिवासींना ते राहत असलेल्या जागेवर त्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी वनहक्क नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबत निर्णय झाला होता. गेली कित्येक वर्षे याबाबत कार्यवाही सुरू होती. शुक्रवारी जागतिक वसुंधरा दिनाच्या निमित्ताने अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी अधिनियम २००६ अंतर्गत आदिवासींना ते राहत असलेल्या जमिनी बाबत वन हक्क नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले.

वनहक्क अंतर्गत प्रत्येक आदिवासी बांधवाला ०.०१ हेक्टर जमीन दिली जाणार आहे. आदिवासींनी शासन योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढे येणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आमदार भरत गोगावले यांनी या वेळी केले

रोहा उपवनसंरक्षक व सहाय्यक वनसंरक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली महाड वनक्षेत्रपाल राकेश साहू यांच्या प्रयत्नाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाड तालुक्यातील १३ आदिवासी बांधवांना यावेळी वनहक्क नोंदणी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यापैकी बबन बाबू पवार, बेंडू काल्या पवार, भिखू जानू पवार आणि वसंत सिताराम पवार या चौघांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, पनवेल**
**पिनकोड–४१०२०६**
**E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in**
**दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२७७८ फॅक्स – ०२२–२७४६७४४०**
**ई–कार्यप्रणाली अंतर्गत ई–निविदा क्र. ०४ (ई–निविदा) सन २०२२–२३ (फेर निविदा–१)**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२– २७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामखात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरीता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप– या निविदेमध्ये एकूण ०४ काम समाविष्ट असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २५.०४.२०२२ सकाळी १०.०० ते दिनांक ०४.०५.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई–निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/----
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :

**सही/–**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विभाग, पनवेल**



**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**
**ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक ०२ सन २०२२-२०२३ (द्वितीय सुचना/फेर निविदा)**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन–४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी–१** नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | भाग अ (स्थापत्य कामाची किंमत) | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पैठण कोतवाल बुद्रुक ते दाभाट धनगरवाडी ते परसुले रस्ता प्रजिमा–१०८, कि.मी. ०/०० ते ७/०० (मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.) तालुका, पोलादपूर, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०४ जिल्हा व इतर मार्ग)** | १६२५२१४० | १६०१७२११ | १५०००० | ११२०/– | १२ महिने | इतर |

**ई निविदेचे वेळापत्रक (द्वितीय सुचना/फेर निविदा)**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२२/०४/२०२२** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०६/०४/२०२२** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | **निविदापूर्व बैठक** | मा. अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२९/०४/२०२२** वेळ **१५.००** वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **१०/०५/२०२२** वेळ १२.०० वाजता |

**टिप :–** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/१८७३**
**दिनांक : २०/०४/२०२२**

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# चेन्नईचा मुंबईवर थरारक विजय

## महेंद्रसिंह धोनीची मॅचविनिंग खेळी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये गुरुवारी झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने मुंबई इंडियन्स तीन गडी राखून थरारक विजयाची नोंद केली. चेन्नईचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीने जुन्या रंगात येत फिनिशरची भूमिका बजावली. धोनीने शेवटच्या षटकात चौकार आणि षटकार लगावत विजय खेचून आणला. या पराभावनंतर मुंबईचा एकूण सात सामन्यांत हार झाली असून हा संघ प्ले ऑफपर्यंत पोहचू शकणार नसल्याचेही आता स्पष्ट झाले आहे.

मुंबईने दिलेल्या १५६ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी मैदानात उतरताच चेन्नई संघाला पहिल्याच चेंडूवर मोठा फटका बसला. सलामीला आलेला ऋतुराज गायकवाड शून्यावर झेलबाद झाला. त्यानंतर चेन्नईचे खेळाडू ठराविक अंतरावर बाद होत गेले. सलामीला आलेल्या उथप्पाने ३० धावा केल्या, तर मिचेल सँन्टरने ११ धावा करून संघाला लक्ष्यापर्यंत जाण्यास मदत केली.

मुंबईच्या गोलंदाजांनी चेन्नईच्या फलंदाजांना शेवटपर्यंत रोखून धरले. मधल्या फळतील अंबाती रायडूने चांगली खेळी करत चेन्नईसाठी ४० धावा केल्या, मात्र शिवम दुबे (१३), रवींद्र जाडेजा (३) स्वस्तात बाद झाले. शेवटी महेंद्रसिंह धोनी आणि ड्वेन प्रिटोरिअस या जोडीने चेन्नईला विजयापर्यंत नेले. धोनीने शेवटच्या षटकात १७ धावांची गरज असताना षटकार आणि दोन चौकार लगावत विजय खेचून आणला, तर प्रिटोरिअसने २२ धावा करीत चेन्नईच्या पडत्या काळात धोनीला साथ दिली. शेवटी धोनीने फिनिशरची भूमिका बजावत चेन्नईला विजय मिळवून दिला.

याआधी नाणेफेक जिंकून चेन्नईने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मुंबई संघ सुरुवातीला फलंदाजीसाठी आला, मात्र मुंबईची सुरुवात अतिशय खराब झाली. मुंबईचे दोन्ही सलामीवीर कर्णधार रोहित शर्मा आणि इशान किशन पहिल्याच षटकात शून्यावर बाद झाले. संघ २३ धावांवर असताना दुसर्‍या विकेटसाठी आलेला देवाल्ड ब्रेविसदेखील बाद झाला. त्यानंतर मधल्या फळीतील खेळाडूंनी मुंबईचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. सूर्यकुमार यादवेने ३२ धावा केल्या, तर चौथ्या विकेटसाठी आलेल्या तिलक वर्माने ५१ धावांची नाबाद अर्धशतकी खेळी केली. त्याने ४३ चेंडूमध्ये ५१ धावा केल्या तसेच हृतिक शोकीन (२५) आणि किरॉन पोलार्ड (१४) यांनीदेखील संघाला १५५ धावांपर्यंत घेऊन जाण्यास मदत केली. जयदेव उनाडकट यानेदेखील नाबाद १९ धावांची खेळी केली.

## धाटाव विभागीय कबड्डी स्पर्धेत रोठ खुर्द संघ अव्वल

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील तळाघर येथे गुरुवारी (दि. २२) धाटाव पंचक्रोशीची कबड्डी स्पर्धा रंगली. या स्पर्धेत रोठ खुर्द संघाने अंतिम फेरीतील सामन्यात उत्कृष्ट खेळाचा नमुना पेश करीत श्री गणेश वाशीला पराभूत करून विजेतेपद पटकाविले.



विभागीय कबड्डी स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील नामवंत असलेले जय बजरंग रोहा, जय हनुमान वाशी, नवतरुण तळाघर, सोनारसिद्ध धाटाव, नूतन सोनारसिद्ध धाटाव, रोठ खुर्द, श्री गणेश वाशी यांसारख्या नामवंत १६ संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेत तृतीय क्रमांक गावदेवी रोठ बुद्रुक व चतुर्थ क्रमांक नवतरुण तळाघर संघाने मिळविला. त्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

मालिकावीराचा मानकरी रोठ खुर्द संघाचा अष्टपैलू खेळाडू आशिष मोरे ठरला. उत्कृष्ट चढाईपटू प्रणित रटाटे (वाशी), उत्कृष्ट पकडपटू संतोष जाईलकर (तळाघर), उत्कृष्ट कोपरा रक्षक शशिकांत लहाने (वाशी), मध्य रक्षक आदित्य मोरे (रोठ बुद्रुक), पब्लिक हिरो म्हणून सनी भगत (रोठ खुर्द) यांना सन्मानित करण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अमित घाग, तळाघर हायस्कूलचे चेअरमन विठ्ठल मोरे, आगरी नेते हरिश्चंद्र मोरे, अमर सलागरे, सचिन मोरे, रामचंद्र मोरे, पोशा कांबळे, हेमंत ठाकूर, अनंता मगर यांच्यासह कबड्डीप्रेमी उपस्थित होते.

## उद्यापासून कल्याणमध्ये जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा

**कल्याण : प्रतिनिधी**


जय शंकर क्रीडा मंडळाच्या वतीने ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने २४ ते २८ एप्रिल या कालावधीत प्रथम श्रेणी आणि द्वितीय श्रेणी स्थानिक पुरुष तसेच महिला गट जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कल्याण कोळसेवाडी येथील कर्मवीर दादासाहेब गायकवाड क्रीडांगणावर या स्पर्धा खेळविण्यात येतील.

या स्पर्धेत तिन्ही गटांत मिळून ९० संघांनी आपला सहभाग निश्चित केला आहे. प्रथम श्रेणी स्थानिक गटातील विजेत्यांना २५ हजार रूपये, द्वितीय श्रेणी स्थानिक गटातील विजेत्या संघाला २० हजार रू., तर महिला गटातील विजेत्यांना १५ हजार रू. व प्रत्येकी चषक प्रदान करण्यात येईल. उपविजेत्या संघांना अनुक्रमे १५ आणि १० हजार रू. व चषक प्रदान करण्यात येईल. सर्व गटातील उपांत्य उपविजयी संघांचा रक्कम व चषक देऊन सन्मान करण्यात येईल. शिवाय सर्वोत्तम खेळाडू, उत्कृष्ट चढाई-पकडीचा खेळाडू यांचा रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येईल.

## चेन्नईच्या मुकेशचा मुंबईविरुद्ध मॅजिक स्पेल

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये गुरुवारी नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करणार्‍या चेन्नई चेन्नई सुपर किंग्जने पहिल्याच षटकात मुंबई इंडियन्सचे दोन्ही सलामीवीर बाद केले. मुकेश चौधरीने रोहित शर्मा आणि इशान किशन या दोन मुंबईच्या सलामीवीरांना शुन्यावर बाद केले.



मुकेश हा कधीकाळी चेन्नईचा नेट बॉलर होता. त्याने यंदाच्या हंगामात चेन्नईकडून आयपीएल पदार्पण केले. त्याने आतापर्यंत सहा सामने खेळत सात विकेट घेतल्या आहेत. मुंबईविरुद्धच्या सामन्यात मुकेशने पहिल्या षटकाच्या दुसर्‍याच चेंडूवर रोहित शर्मांला शुन्यावर बाद करीत मुंबईला मोठा धक्का दिला. त्यानंतर याच षटकाच्या पाचव्या चेंडूवर इशान किशनला शुन्यावरच बाद करीत मुंबईच्या दुसर्‍या सलामीवीरालाही भोपळा फोडू दिला नाही.

विशेष म्हणजे मुकेश हा आयपीएलमध्ये प्रतिस्पर्धी संघाचे दोन्ही सलामीवीर शुन्यावर बाद करण्याचा पराक्रम करणारा भारताचा पहिला आणि जागतिक स्तरावरचा तिसरा खेळाडू आहे. यापूर्वी पाकिस्तानच्या सोहेल तनवीरने २००८मध्ये पंजाब किंग्जविरुद्ध अशी कामगिरी केली होती. त्यानंतर २००९च्या हंगामात रेयान हॅरिसनने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध हा कारनामा केला होता.

मुकेश हा मूळचा राजस्थानमधील भीलवाडाचा राहणारा आहे. तो मुंबईविरुद्ध अशी कामगिरी करणारा पहिला भारतीय अनकॅप्ड खेळाडू ठरला आहे. मुकेशने रोहित आणि इशानबरोबरच डेवाल्ड ब्रेविसलाही बाद करीत मुंबईच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. त्याने तीन षटकांत १९ धावा देत तीन विकेट घेतल्या.

## माईक टायसनला राग अनावर; विमानात सहप्रवाशाला धू धू धूतले


**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

अमेरिकेतील प्रसिद्ध बॉक्सर आणि अभिनेता माईक टायसन नेहमी कुठल्या ना कुठल्या कारणामुळे चर्चेत असतो. आता परत एकदा तो चर्चेत आला आहे. चर्चेत येण्याचे कारण म्हणजे त्याला अनावर झालेला राग. सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय, ज्यात माईक टायसन विमानातील त्याच्या सहप्रवाशाला मारहाण करताना दिसत आहे.

५५ वर्षीय माईक टायसन नेहमीच त्याच्या रागीट स्वभावासाठी ओळखला जातो. मिळालेल्या माहितीनुसार माईक टायसन सॅन फ्रान्सिस्कोहून फ्लोरिडाला जेटब्लू विमानाने जात होते. या वेळी फ्लाइटमध्ये टायसनच्या मागे सीटवर एक व्यक्ती बसली होती, तो वारंवार टायसनला प्रश्न विचारत होता. अनेकदा नकार देऊनही त्या व्यक्तीने माईक टायसनशी बोलणे थांबवले नाही. यानंतर राग अनावर होऊन टायसन त्या व्यक्तीच्या तोंडावर जोराने ठोसे मारतो. विमानातील एका व्यक्तीने त्याच्या मोबाइलमध्ये हा सगळा प्रकार कैद केला आहे.

## मुंबई संघ कठीण काळातून जातोय, त्यांच्यासोबत राहिले पाहिजे -सचिन

**मुंबई : प्रतिनिधी**



आयपीएलचे पाच वेळा विजेतेपद मिळवणार्‍या मुंबई इंडियन्स संघाची यंदाच्या हंगामात अतिशय खराब कामगिरी झाली. संघाने सलग सात सामने गमावले आहेत. मुंबई इंडियन्सचे प्ले ऑफमध्ये पोहचण्याचे स्वप्नदेखील जवळजवळ संपुष्टात आले आहे. संघाच्या या खराब कामगिरीवर मेंटर सचिन तेंडुलकरने प्रथमच प्रतिक्रिया दिली आहे.

चेन्नईविरुद्धच्या लढतीआधी सचिन म्हणाला, मुंबईचा संघ युवा आहे आणि चुकांमधून शिकत आहे. संघ सध्या कठीण काळातून जात आहे. यासाठी आपल्याला त्यांच्यासोबत राहिले पाहिजे. एक संघ म्हणून पुढे गेले पाहिजे. हा युवा खेळाडूंचा संघ आहे. ते चुका करतील आणि त्यातून शिकतीलदेखील. सचिनच्या मते गेल्या काही वर्षांतील मुंबईने जी कामगिरी केलीय ती पाहता लोकांना त्यांच्याकडून फार अपेक्षा असतात.

टी-२० हा फॉर्मेट असा आहे की सर्व संघ अशा काळातून जातात. आपल्याला सर्वांत आधी हे समजून घेतले पाहिजे की या फॉर्मेटमध्ये असा कोणताही संघ नाही ज्यांनी असा अनुभव घेतला नाही. सामन्यातील महत्त्वाचे क्षण तुमच्या बाजूने असत नाहीत. कधी कधी तुम्ही दोन किंवा तीन धावांनी किंवा अखेरच्या चेंडूवर पराभूत होता. अगदी प्रामाणिकपणे बोलायचे झाले तर संधी आमच्या बाजूने आल्या नाहीत. मी आणखी एक गोष्ट सांगतो, अशा कामगिरीनंतर खेळाडू सराव करताना प्रचंड मेहनत घेतात. ते कुठेच कमी पडत नाहीत.



## कुस्तीपटू सरिता, सुषमाला कांस्यपदक

**उलानबाटार : वृत्तसंस्था**

मंगोलियामध्ये सुरू असलेल्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सरिता मोर आणि सुषमा शोकीन यांनी कांस्यपदके जिंकली.

५९ किलो वजनी गटात सरिताने दोन पराभवांनंतर उझबेकिस्तानच्या दिलफुझा एम्बेटोव्हावर तांत्रिक गुणाधिक्याच्या बळावर मात केली, तर डायना कायुमोव्हाला ५-२ असे हरवले. याचप्रमाणे ५५ किलो गटात सुषमाने कझाकस्तानच्या अलटायन शेगायेव्हावर ५-० असा शानदार विजय मिळवला, तर उझबेकिस्तानच्या सार्बिनाझ जीनबाईव्हाला चीतपट केले.

## चेन्नई संघात 'छोटा मलिंगा'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या यंदाच्या हंगामात चेन्नईला स्पर्धेपूर्वीच दुखापतीचा फटका बसला होता. त्यांचा सर्वात महागडा खेळाडू दीपक चहर दुखापतीमुळे आयपीएलच्या संपूर्ण हंगामाला मुकला आहे. आता अॅडम मिल्नेदेखील आयपीएलमधून बाहेर गेला आहे. त्याच्या जागी चेन्नईने रिप्लेसमेंट म्हणून श्रीलंकेच्या मथीशा पाथिराना याला संघात दाखल करून घेतले आहे.



कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात अॅडम मिल्नेला दुखापत झाली होती. आता संघ व्यवस्थापनाने मिल्ने हा उर्वरित आयपीएल हंगामाला मुकणार असल्याचे स्पष्ट केले. चेन्नईने मिल्नेची रिप्लेसमेंट म्हणून मथीशा पाथिराना याचा संघात समावेश केला आहे.

मथिराना हा फक्त १९ वर्षांचा असून त्याची गोलंदाजी शैली लसिथ मलिंगासारखी आहे. त्याने १९ वर्षाखालील वर्ल्डकपमध्ये आपल्या गोलंदाजीने सर्वांना प्रभावित केले होते. पथिरानाला चेन्नईने त्याची बेस प्राईस २० लाख रूपयाला विकत घेतले आहे. पथिरानाला छोटा मलिंगा या टोपण नावानेही ओळखले जाते.

## आगामी स्पर्धांसाठी भारतीय बॅडमिंटन संघ जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय बॅडिमटन संघटनेने आशियाई आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसह थॉमस-उबेर चषकासाठी भारतीय संघाची घोषणा गुरुवारी केली. यात उदयोन्मुख बॅडमिंटनपटू उन्नत्ती हुडाची आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या भारतीय संघात निवड झाली आहे.

इंदिरा गांधी राष्ट्रीय स्टेडियमवर झालेल्या सहा दिवसांच्या निवड चाचणी स्पर्धेतील कामगिरीआधारे हा संघ निवडण्यात आला आहे. पी. व्ही. सिंधूवर राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत मदार असेल. पुरुषांमध्ये लक्ष्य सेन, किदम्बी श्रीकांत यांच्यावर संघाची धुरा आहे.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा : पुरुष-लक्ष्य सेन, किदम्बी श्रीकांत, सात्त्विकसाइराज रंकीरेड्डी, चिराग शेट्टी आणि बी. सुमीत रेड्डी; महिला- पी. व्ही. सिंधू, आकर्षी कश्यप, त्रिसा जॉली, गायत्री पी., अश्विनी पोनप्पा. आशियाई क्रीडा स्पर्धा आणि थॉमस-उबेर चषक : पुरुष-लक्ष्य सेन, किदम्बी श्रीकांत, एचएस प्रणॉय, प्रियांशू राजावत, चिराग शेट्टी, सात्त्विकसाइराज रंकीरेड्डी, ध्रुव कपिला, एमआर अर्जुन, विष्णू वर्धन गौड, कृष्ण प्रसाद गारिगा; महिला-पी. व्ही. सिंधू, आकर्षी कश्यप, अश्मित चलिहा, उन्नत्ती हुडा, त्रिसा जॉली, गायत्री पी, एन. सिक्की रेड्डी, अश्विनी पोनप्पा, तनिषा क्रॅस्ट्रो आणि श्रुती मिश्रा.



सौजन्य : सौ. रत्नप्रभा घरत (अध्यक्ष, पनवेल तालुका महिला मोर्चा), सुहासिनी केकाणे



सौजन्य : निखील माळी

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com